काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महोल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सहल थंड प्रदेशाची
• थर्मल • स्वेटर्स • जर्किन • ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला • कापड बाजार, नं.9422226599 • यशोदानगर, पाईपलाईन रोड,
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १३.०१.२०२५ | अंक नं. २६५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# राज्यात बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठीचे ऑनलाईन पोर्टल बंद; ५४ लाख कामगार वंचित

## कामगार संघटना कृती समितीचे २१ जानेवारीपासून मुंबईच्या आझाद मैदानात उपोषण

नगर – मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे व संघटनांच्या वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यानंतरही बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी ऑनलाईन पोर्टल पूर्ववत सुरु होत नसल्याने महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना कृती समितीच्या वतीने २१ जानेवारी रोजी मुंबई येथील आझाद मैदानात बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. कृती समितीचे निमंत्रक शंकर पुजारी, सहनिमंत्रक सागर तायडे व विनिता बाळेकुंदरी यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या उपोषणास जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा निमंत्रक शंकरराव भैलुमे यांनी केले आहे.

सध्या महाराष्ट्र मध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे २८ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत. इतकेच नव्हे तर २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज प्रलंबित आहेत. बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी असलेले ऑनलाईन पोर्टल बंद पडल्याने, एकूण ५४ लाख बांधकाम कामगारांचे काम सध्या पूर्णपणे बंद पडल्याच्या अवस्थेत आहे.

या मंडळाचे सचिवांनी कारस्थान करून आचारसंहिता सुरू आहे, म्हणून काम करता येणार नाही! असे सांगून सर्व कामकाज बंद पाडल्याचा आरोप कृती समितीच्या वतीने करण्यात आला आहे. आचारसंहिता व या नोंदणीचा काही संबंध नसताना पोर्टल बंद करण्यात आले. याविरोधात कामगार संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयांमध्ये याचिका दाखल केली होती. याबाबत ६ नोव्हेंबर २०२४ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने एका दिवसात पूर्वी प्रमाणे सर्व कामकाज ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्याचे आदेश दिले आहे. परंतु जाणीवपूर्वक बड्या कंत्राटदारांचे भले करण्यासाठी लाखो कामगारांना सगळ्या लाभांपासून वंचित ठेवण्यासाठी या मंडळाचे सचिव यांनी तालुका पातळीवर ऑनलाईनचे काम करण्यात येईल असे घोषित करून, प्रत्यक्षामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाची पायमल्ली केली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या अन्यायाविरुद्ध नागपूर विधानसभेवर १८ डिसेंबर रोजी बांधकाम कामगारांनी मोर्चा काढला. त्यानंतर २ जानेवारी रोजी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी बांधकाम कामगारांचे पोर्टल पूर्वत पूर्व करण्यात येईल असे आश्वारसन दिले होते. पण प्रत्यक्षात पोर्टल सुरू न झाल्याने बांधकाम कामगारांमध्ये असंतोष पसरलेला आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी तालुका कामगार सेवा केंद्र पूर्णपणे कुचकामी ठरत आहे. त्या ठिकाणी कामगारांचे शोषण सुरु असून, २१ जानेवारी पर्यंत पोर्टल सुरु न झाल्यास राज्यातील सर्व बांधकाम कामगार मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषणास बसणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

या उपोषणासाठी शंकरराव भैलुमे (अहिल्यानगर), नागेश बनसोडे (सोलापूर), सागर कुंभार (सातारा), मंगेश माटे (भंडारा), सुनील लाखे (नाशिक), वाहिद पठाण (संभाजीनगर), संदीप भंडारे (अकोला), अजय कांबळे (लातूर), नितीन यादव (सातारा) आदी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक प्रयत्नशील आहेत.


कर्तृत्वाचा आलेख..
आपुला असाच वाढत जावो..
पुन्हा पुन्हा अभिनंदनाचा योग येत रहावा..
मा.श्री. दत्ताशेठ जाधव
अध्यक्षः अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, अ.नगर
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
वेदांत फ्लोरीस्ट & बलुन (होलसेलर) वेदांत पार्टीशॉप
पटवेकर डेकोरेटर्स मंडप, लाईट, फ्लॉवर, फर्निचर वाडीयापार्क रोड, माळीवाडा, अ.नगर.
विशाल पटवेकर (वस्ताद) । विकास (पिनु) पटवेकर । विनोद पटवेकर । उदय पटवेकर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

विनम्र अभिवादन


काळाचा महिमा काळच जाणे,
कठीण तुमचे आमच्यातून जाणे,
आजही घुमतो स्वर तुमचा कानी,
वाहताना श्रद्धांजली डोळ्यात येते पाणी
माजी आमदार
कै.कि.बा उर्फ काकासाहेब म्हस्के
यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त आणि
कै.पार्वतीबाई म्हस्के यांच्या ३२ व्या
पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन....
डॉ. श्री. सुभाष म्हस्के (कार्यकारी विश्वस्त), काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फौंडेशन.
डॉ.सौ.सुमती म्हस्के (विश्वस्त), डॉ.श्री.अभितेज म्हस्के (विश्वस्त),
डॉ.सौ. दीप्ती ठाकरे (विश्वस्त), आर्किटेक्ट श्री. समीर ठाकरे (मुख्य कार्यकारी अधिकारी)
प्राचार्य डॉ.विवेक रेगे – काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी मेडिकल कॉलेज अँड पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट.
प्रा. श्री. नितीन ढुबे- प्राचार्य, काकासाहेब म्हस्के डी. ॲण्ड बी. फार्मसी कॉलेज
प्रा.श्री. अजित चवरदार- प्राचार्य, पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिट्यूट
(ए.एन.एम., जी.एन.एम.ॲण्ड बी.एस.सी. नर्सिंग)
सर्व शिक्षक, विद्यार्थी, स्टाफ
काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुल,
बोल्हेगाव फाटा, नागापूर, अहिल्यानगर

घराची सुरक्षा
३६५ दिवस
३६० डिग्रीमध्ये

ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com
कान, नाक, घसा मोफत तपासणी शिबीर
गुरूवार दि. १६-०१-२०२५ * वेळ : सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर्स डॉ. सुकेशिनी गाडेकर (ई.एन.टी.सर्जन)
डॉ. अतुल तुपे (एम.एस. ई.एन.टी.सर्जन)
शस्त्रक्रियेवर 50% सवलत
* घशाच्या एन्डोस्कोपीची सुविधा
* ॲलर्जी, घोरणे, चक्कर येणे,
* श्वास घेण्याची समस्या,
* बोलण्यात समस्या व इतर आजारांवर उपचार.

हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजीटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 800/- | सिटी स्कॅन रू.1250/- | एम.आर.आय. रू. 2500/-

आमचा कणा..
आमचे भाऊ..
मोठी स्वप्नं पाहणारे आणि
स्वप्नांना सत्यात उतरवणारे..
मैत्रीचे नाते जोपासणारे..
जनहितासाठी रात्रंदिवस
तयार असणारे..
श्री. दत्ताभाऊ जाधव
महात्मा फुले समता परिषद
महानगर शहराध्यक्ष
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

Design Addict
आपणांस उदंड दिर्घायुष्य लाभो हीच सदिच्छा...
Vithai Developers
PRAGATI DEVELOPERS
श्रीमान कलेक्शन

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## अद्‌भूत हिंदू संस्कृतीचे अमृतपर्व - कुंभमेळा

तुम्ही मानत असालच आपला भारत आणि सनातन हिंदू संस्कृती अद्‌भूत, अजरअमर आहे. संक्रांतीनंतर सूर्यदेवाचे उत्तरायण प्रारंभ होते. यंदा तर १४४ वर्षांनी प्रयागराज कुंभमेळ्याचा भव्यदिव्य योग व नियोजन होत आहे.

आजच्या 'प्रॅक्टीकल' भावनेने म्हणावे तर अक्षरशः अब्जावधींच्या उलाढालीबरोबर अमोल आंतरिक समाधानाने हिंदुस्तान आनंदणार आहे.

कुंभमेळ्याच्या रूपाने उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे जगातील सर्वात मोठा मेळावा संपन्न होत आहे. भारताशिवाय इतरत्र कुठेही असा कार्यक्रम आयोजित केला जात नाही किंवा लोकांचा इतका असीम उत्स्फूर्त सहभागही दिसत नाही. एका दिवसात कोट्यवधी लोक एकाच ठिकाणी जमतात, तेही आमंत्रणाशिवाय; ही एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. हा ट्रेंड आजच्या दळणवळणाच्या आणि वाहतुकीच्या युगातला नाही तर जेव्हा

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



कुठल्याच सोयीसुविधा नव्हत्या तेव्हापासून चालत आला आहे. कितीही संकटे आली तरी कुंभ नेहमी ठरलेल्या वेळी आणि ठिकाणी घडतो. लाखो लोकांसाठी, कुंभमेळ्यात सहभागी होणे ही केवळ तीर्थयात्रा नाही, तर शाश्वत अध्यात्माच्या मुळांकडे परत जाणे. एकता, शुद्धीकरण आणि मोक्षाकडे वाटचाल अंतिम मुक्तीचे प्रतीक आहे.

## गुलमोहर रोडवरून मोपेडची चोरी

नगर - सावेडी उपनगरातील गुलमोहोंर रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालय समोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची व्हरेटर मोपेड (क्र.एम एच १६ बी एस १०६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी निलेश अर्जुन इंगळे (वय ४९, राहणार कौस्तुभ अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी, जॉगिंग पार्क समोर, सावेडी ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार जपे करीत आहे.

## ६० वर्षीय अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - तारकपूर येथील महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाच्या गेटजवळ आजारी अवस्थेत आढळून आलेल्या ६० वर्षीय अनोळखी इसमास १०८ म्बुलंस (क्रमांक एम एच १२ सी सी ०८२९) ने सिव्हील हॉस्पीटल येथे उपचाराकरिता दाखल केले असता त्याच्यावर उपचार सुरु असताना तो ११ जानेवारी रोजी मयत झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी घोषित केले

या प्रकरणी सिव्हिल हॉस्पीटलचे वैद्यकीय ऑफीसर डॉ.बोठे यांनी दिलेल्या अहवालानुसार तोफखाना पोलिसांनी बी एन एस एस १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद केली अधिक तपास सहायक फौजदार तनवीर शेख करीत आहेत. मृत इसमाजवळ त्याची ओळख पटण्याइतपत कोणतीही चीजवस्तु आढळुन आलेली नसल्याने त्याला कोणी ओळखत असल्यास अगर त्याचे नातेवाईकाबाबत कोणाला काही माहीत असल्यास त्यांनी ०२४१-२४१६११८ / ९९२३७०७१७० या फोन वर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले.

## रामकृष्ण पडोळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रामकृष्ण गणपत पडोळे (वय ७५, रा.टिळकरोड, पडोळे चाळ) यांचे १२ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वाडीयापार्क येथील स्वामी मोबाईलचे मच्छिंद्र, संदीप, पंचम पडोळे यांचे ते वडील होत तर राजूशेठ पडोळे यांचे चुलते होत.

## अलिप्त बेद्रे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील अलिप्त किसनराव बेद्रे (वय ६०, रा.द्वारकाधीश कॉलनी, भिंगार) यांचे ७ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर विजयलाईन येथील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते श्री इलेक्ट्रीकल्स्, भिंगारचे संचालक होते. त्यांच्या मागे पत्नी, ३ भाऊ, भावजया, मुली, जावई, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## प्रदिप गांधी यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - श्रीरामपूर येथील वर्धमान हौसिंग सोसायटी, वॉर्ड नं ७ येथील रहिवासी प्रदिप सुरजमल गांधी (वय ६६) यांचे १३ जानेवारीला पहाटे ३ वा. हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते नयन व ओम गांधी यांचे वडील, सुशील विनय गांधी यांचे चुलते तर महावीर मुनोत यांचे मामा होत.

## मनोहर तलरेजा यांचे निधन



श्रीरामपूर - श्रीरामपूर येथील नेहरूनगर, वॉर्ड नं.२ येथील रहिवासी मनोहर हुकुमतमल तलरेजा (वय ५५) यांचे १३ जानेवारीला सकाळी १० वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. ते सुनिल व अनिल तलरेजा यांचे थोरले बंधू, रोशन तलरेजा यांचे वडील, नरेंद्र हरिलाल तलरेजा यांचे चुलते होत.

## अनुसया पटारे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - तालुक्यातील भोकर येथील प्रगतशील शेतकरी कुटुंबातील अनुसया भागवतराव पटारे (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे ४ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

गंगापूर येथील मुक्तेश्वर सहकारी साखर कारखान्याचे निवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब पटारे, प्रगतशील शेतकरी बाळासाहेब पटारे, छत्रपती संभाजीनगर येथील शुगर इंडस्ट्रीयल सप्लायर्सचे भास्करराव पटारे व एस.टी. महामंडळाचे निवृत्त उपमहाव्यवस्थापक मधुकर पटारे यांच्या त्या मातोश्री होत. तसेच अहिल्यानगर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत पटारे, सिद्धीविनायक चिल्ड्रन्स हॉस्पिटलचे बालरोग तज्ज्ञ डॉ. प्रताप पटारे व पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटलच्या मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भक्ती पटारे यांच्या त्या आजी होत.

# कुस्तीला वैभव मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आवाहन; महाराष्ट्र केसरी स्पर्धा मैदानाचे मातीपूजन

नगर - केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते कै.बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरी वाडिया पार्क येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धा मैदानाचे मातीपूजन करण्यात आले. कुस्तीला नवे वैभव मिळवून देण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करावे, असे आवाहन श्री. मोहोळ यांनी केले.

कार्यक्रमाला आ. शिवाजीराव कर्डिले, अहिल्यानगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ.संग्राम जगताप, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी आ. अरुण जगताप, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै.संदीप भोंडवे, उपाध्यक्ष गुलाबराव दगडे, सरचिटणीस हिंदकेसरी पै.योगेश दोडके आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्याला कुस्तीची वैभवशाली परंपरा आहे. त्यामुळे इथे होणारी महाराष्ट्र केसरी स्पर्धा निश्चितपणे मोठी आणि यशस्वी होईल. खाशाबा जाधव यांच्यानंतर ऑलिम्पिकमध्ये पदक मिळविणारा पैलवान आपल्याकडे झाला नाही. त्यामुळे अशा स्पर्धेतून कुस्तीमध्ये देशाचे नेतृत्व करणारे कुस्तीगीर घडविण्याची गरज आहे. स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन झाल्यास कुस्तीगीरांना प्रेरणा मिळते. अहिल्यानगरमध्ये होणारी स्पर्धा कुस्ती क्षेत्राला नवी ऊर्जा देण्यात यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



नगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या मैदानाचे मातीपूजन करताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ समवेत आ. शिवाजीराव कर्डिले, आ.संग्राम जगताप, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी आ. अरुण जगताप, पै.संदीप भोंडवे, गुलाबराव दगडे, हिंदकेसरी पै.योगेश दोडके आदी.

महाराष्ट्रातल्या मातीतल्या या खेळाला शासनाने भरीव अर्थसहाय्य दिले असून महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी १ कोटी रुपये देण्याचा आणि महाराष्ट्र केसरी आणि हिंदकेसरींच्या पुरस्कार रकमेतही वाढ करण्याचा निर्णय शासनाने यापूर्वीच्या स्पर्धेच्यावेळी घेतला आहे, असेही ते म्हणाले.

आमदार कर्डिले म्हणाले, कुस्तीमुळे शरीर निरोगी आणि मन शुद्ध रहाते, जीवनात नवी ऊर्जा मिळते. लाल मातीत श्रम करतांना पैलवानांनी चुकीच्या गोष्टीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. स्पर्धेच्या निमित्ताने पैलवानांना प्रोत्साहन दिल्यास त्यांना पुढील कारकिर्दीसाठी ऊर्जा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

आमदार जगताप म्हणाले, महाराष्ट्र केसरी स्पर्धेला वेगळे महत्व आहे. २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा होणार असून राज्यातील मल्ल स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेतून देशभरातील मल्लांना प्रेरणा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अहिल्यानगर जिल्ह्याला कुस्तीची गौरवशाली परंपरा आहे, हे वैभव आणखी वाढविण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणाले.

श्री.तडस म्हणाले, महाराष्ट्रातील कुस्तीगीरांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगले यश संपादन केले आहे. महाराष्ट्र कुस्तीगीर संघातर्फे कुस्तीगीरांना चांगल्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यांनी ऑलिंपिक, आशियाई आणि राष्ट्रकुल स्पर्धेत चांगले यश मिळावे यासाठी प्रयत्न होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुस्तीगीरांना राजाश्रय देण्याचे, त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याचे कार्य केले. कुस्तीच्या विकासासाठी तालुका पातळीवर मॅटची सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. संतोष भुजबळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र केसरी, उप महाराष्ट्र केसरी, कुस्तीप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## तारकपूर परिसरात दोघांकडून पती पत्नीस मारहाण; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - भावाला मारहाण होत असताना मध्ये गेलेल्या तरूणासह त्याच्या पत्नीला दोघांनी मारहाण केल्याची घटना ११ जानेवारीला रात्री १० वाजण्याच्या सुमारास तारकपुर परिसरातील शांतीपुर, बार्शी कॉलनी येथे घडली. या प्रकरणी अलविनंद राजेंद्र हिवाळे (वय ३९) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दोघांविरूध्द गुन्हा दाखल केली आहे.

बंटी पटेकर आणि भावड्या पटेकर (पूर्ण नावे, पत्ता माहित नाहीत) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शनिवारी रात्री जेवणानंतर कुटुंबासह टीव्ही पाहत असताना त्यांच्या भावाच्या घरातून आरडाओरडा ऐकू आला. आवाज ऐकून त्यांनी व त्यांच्या पत्नीने भावाच्या घरात जाऊन पाहिले असता, बंटी पटेकर हातात लाकडी दांडा घेऊन त्यांच्या भावाला मारहाण करत होता, तर भावड्या पटेकर लाथाबुक्यांनी मारहाण करत होता. हे थांबवण्यासाठी हिवाळे व त्यांच्या पत्नीने हस्तक्षेप केला असता, बंटीने हिवाळे यांच्या खांद्यावर लाकडी दांड्याने प्रहार केला आणि भावड्याने त्यांची पत्नीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. शिवाय, दोघा संशयितांनी शिवीगाळ करत त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर जखमी हिवाळे दाम्पत्याने येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात जाऊन उपचार घेतले आणि तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# घरात अनाधिकाराने घुसून साहित्याची चोरी

### दर्गा दायरा येथील घटना, चौघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर. - बंद घराचे कडी कोयंडा कुलूप तोडून चौघांनी आत प्रवेश केला. आतील घराची सामायिक भिंत पाडून, घरातील अठरा हजार रुपयांचे साहित्य चोरून नेले. ही घटना नगर संभाजीनगर रोड लगत असलेल्या मुकुंदनगर जवळील दर्गादायरा येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की रफिक दादामिया शेख (वय ७३ राहणार दर्गादायरा मुकुंदनगर, हल्ली रा. बोरगाव, अंबरनाथ, ठाणे) यांच्या बंद घराचे कुलूप मुस्तफा मजीद शेख, मुजाहिद मजीद शेख, मजीद हुसेनमिया शेख, अब्दुल रहीम हुसेन मिया शेख (सर्व रा.दर्गा दायरा, मुकुंदनगर) यांनी तोडून आत प्रवेश केला. आतील सामाईक भिंत पाडून घरातील सहा हजार रुपये किमतीचे दोन फ्रिज पाच हजार रुपये किमतीची गॅस शेगडी, पाच हजार रुपये किमतीचे गॅस सिलेंडर असे १८ हजार रुपये किमतीचे घर साहित्य चोरून नेले. तसेच हा प्रकार पाहणाऱ्या लोकांना शिवीगाळ दमदाटी केली.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी रफिक शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४), ३०५, ३२९ (४), ३५१ (२) (अ), ३५२, १३१, ३ (५) अन्वये घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद केली पुढील कारवाई पोलीस हवालदार शेख करीत आहे.

## तरुणीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका तरुणासह त्याच्या आईवर गुन्हा दाखल

नगर - युवक व त्याच्या आईच्या सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना जयदीप अपार्टमेंट, डॉन बॉस्को शाळेजवळ, कॉटेज कॉर्नर येथे घडली. दिशा स्वप्नील बागुल (वय १७) असे आत्महत्या केलेल्या अल्पवयीन मुलीचे नाव आहे. या प्रकरणी दोघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी तिची आई झेनित स्वप्नील बागुल (वय ३९) यांनी शनिवारी सायंकाळी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अंश रत्नपारखी व त्याच्या आई (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी झेनित एका शाळेत शिक्षिका आहे. त्या ९ जानेवारीला सकाळी शाळेत असताना दिशाचा मित्र अंश रत्नपारखीच्या आईने फोन करून अंश घरी नसल्याचे सांगून दिशाबाबत विचारणा केली. त्या वेळेस दिशाचा फोन व्यस्त होता. रत्नपारखी यांनी झेनित यांना 'दिशाला नीट करेल' अशी धमकीही दिली. दरम्यान, झेनित शाळेत असताना व घरी परत येत असतानाही दिशा फोन उचलत नव्हती. त्या घरी आल्यानंतर त्यांना घराचा दरवाजा बंद असल्याचे दिसून आले. त्यांनी इतरांच्या मदतीने दरवाजा तोडला व आत प्रवेश करताच दिशा हॉलमधील पंख्याला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसली. तिला तातडीने रूग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. दरम्यान, दिशाचा मित्र अंश रत्नपारखी आणि तिची ओळख शाळेपासून होती. अंशकडून त्रास होत असल्याने झेनित यांनी दोन महिन्यांपूर्वी पोलिसांकडे याबाबत तक्रार केली होती. अंशने पोलिसांसमोर माफी मागून संबंध तोडण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अंश व त्याची आई यांच्याकडून दिशाला फोन करून त्रास दिला जात होता. दिशाला मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप झेनित बागुल यांनी अंश रत्नपारखी आणि त्याची आई यांच्यावर केला आहे. या फिर्यादीवरून दोघांविरुध्द दिशा हीच आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भारतीय न्याय सहिता १०७ (३), (५) अन्वये गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक उज्वल सिंह राजपूत हे करीत आहे.

## गुलमोहर रोड येथून कारची चोरी

नगर - राहत्या घरासमोर, रस्त्याच्या कडेला, लॉक करून लावलेली मारुती सुझुकी कंपनीची कार (क्र. एम एच १६ सी सी ०११९) कोणीतरी अज्ञात चोरट्याने लॉक खोलून चोरुन नेली. ही घटना सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील रिद्धी सिद्धी कॉलनी येथे घडली. यांप्रकरणी तोफखाना पोलिसांनी अमित कांबळे (वय ३३, राहणार रिद्धी सिद्धी कॉलनी गुलमोहर रोड, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चर्चा विरुद्ध भारतीय न्याय सहिता ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार पिता-पुत्राचा मृत्यू

नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नेवासाफाटा येथील राजमुद्रा चौकात रविवारी (१२ जानेवारी) रात्री आठच्या झालेल्या भीषण अपघातात वडील आणि त्यांच्या लहान मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

सुरेशनगर, हंडीनिमगाव येथील अनिल फिलीप दळवी (वय ४५) आणि त्यांचा १२ वर्षीय मुलगा प्रतीक हे भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकच्या धडकेत गंभीर जखमी झाले. अपघात इतका भीषण होता की पिता-पुत्राचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाला असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघाताला कारणीभूत असलेल्या ट्रकचालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाला गती दिली आहे.अपघातानंतर काँग्रेसचे नेवासा शहर अध्यक्ष अंजुम पटेल, संजय वाघमारे, वाहतूक पोलिस सुनील पालवे आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पटेल यांनी यापूर्वीही रस्त्यावरील समस्यांवर उपाययोजनांसाठी निवेदन दिले होते. पटेल यांनी नमूद केले की, अहिल्यादेवी चौक ते शेवगाव चौक दरम्यान जागतिक बँकेने तयार केलेले एक फूट उंचीचे डिव्हायडर हे अनेक अपघातांना कारणीभूत ठरले आहे. रात्रीच्या अंधारात हा डिव्हायडर स्पष्ट दिसत नसल्यामुळे अनेक वाहनचालकांचे नियंत्रण सुटते. त्यांनी यापूर्वीही हा डिव्हायडर हटवण्याची मागणी केली होती, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.



राजमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना आ.संग्राम जगताप. समवेत गणेश भोसले, सुनील रामदासी, नरेंद्र कुलकर्णी, प्रकाश भागानगरे, अभिजीत खोसे, सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, संतोष लांडे, जितेंद्र बनकर, वैभव वाघ, अमित खामकर, दादासाहेब पांडुळे, मळू गाडळकर, नितीन लिंभोरे, सागर गुंजाळ आदी उपस्थित होते.

# लग्नाचे आमिष दाखवून व मारहाण, दमदाटी करत युवतीवर अत्याचार

### तरूणाविरूध्द गुन्हा दाखल

नगर - लग्नाचे आमिष दाखवून व मारहाण, दमदाटी करत युवतीवर बळजबरीने अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पीडित युवतीने नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अत्याचार करणार्या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिराज शेख (रा. घाटनांदुर अंबेजोगाई, जि. बीड) असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे. पीडित युवतीने सिराजवर लग्नाचे आमिष दाखवून वेळोवेळी शारीरिक शोषण केल्याचा आरोप केला आहे. फिर्यादी मुळच्या भोर (जि. पुणे) तालुक्यातील रहिवाशी असून सध्या अहिल्यानगर येथे वास्तव्यास आहेत. सिराज शेख याने त्यांना लग्नाचे आमिष दाखवून खडकी खंडाळा येथील लॉजवर तसेच त्यांच्या घरी शारीरिक संबंध ठेवले. पीडिताने नकार देऊनही सिराजने तिला धमकावून व मारहाण करून संबंध ठेवले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, सदरची घटना १४ जुलै २०२४ रोजी घडली असून पीडित युवतीने सदरचा प्रकार ११ जानेवारीला नगर तालुका पोलिसांना सांगितला. पीडितेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सायंकाळी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर आरोग्यावर होईल परिणाम

अन्न व्यवस्थित झाकले नाही किंवा फ्रिजमध्ये जास्त वेळ ठेवल्यास त्यात बॅक्टेरिया वाढू शकतात. हे जीवाणू वारंवार गरम केल्याने मारले जात नाहीत आणि अन्नासह आपल्या शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळे पचनास त्रास होऊ शकतो.

## पाककला

### पोह्यांचे लाडू

**साहित्य :** अर्धा किलो पोहे, २ वाट्या सुक्या खोबऱ्याचा कीस, २ वाट्या काजू अगर शेंगादाणे, अर्धी वाटी खसखस, पाऊण किलो गूळ अगर साखर, तूप.

**कृती :** खोबरे व शेंगाचे दाणे अगर काजूचे तुकडे भाजून घ्यावेत. पोहे तुपात तळून घ्यावेत. गूळ अगर साखरेचा दोन तारीपेक्षा जास्त पाक करून त्यात तळलेले पोहे, खोबरे व दाणे अगर काजूचे तुकडे व खसखस (भाजून) घालावी आणि सर्व जिन्नस एकत्र चांगले मिसळून लाडू वळावेत. हे लाडू बरेच दिवस टिकतात.

## वास्तू सल्ला

### बँक मॅनेजरचे स्थान

✻ वायव्य भागात मार्केटिंग, क्रेडिट कार्ड विक्री अधिकारी अथवा व्यवसायवृद्धी सहाय्यकांसाठी स्थान असावे.

✻ नैऋत्य दिशेत बँक मॅनेजर व मुख्य लॉकर्सचे स्थान असावे.

✻ बँक मॅनेजर नंतरचे अधिकारी अनुक्रमे दक्षिण व पश्चिम दिशेत असावे. कर्ज वाटप व्यवस्था वायव्येत असावी.

पाण्याची व्यवस्था तसेच ईश्वराचे स्थान ईशान्य दिशेत असावे.

## सौंदर्य

डोळे छोटे असतील, तर काजळ पेन्सिलने खालच्या बाजूने म्हणजेच बाहेरही लायनरच्या टोकापर्यंत लावावे. मध्यम डोळ्यांवर मध्यम आकाराचे लायनर ब्रशच्या साहाय्याने लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५

**मकर संक्रांति, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, पुनर्वसु १०।१७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अडकलेला पैसा मिळेल. पुरोहितांसाठी शुभ दिवस आहे. गैरसमज दूर होतील.

**वृषभ** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानी होऊ शकते. दिवस कालच्या इतका चांगला जाणार नाही.

**मिथुन** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल.

**कर्क** : मित्रांचा सहयोग मिळेल. कामे वेळच्या वेळी पूर्ण होईल. मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

**सिंह** : कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार समोरच्याला पटतील. वाहने व उपकरणे चोरी जातील.

**कन्या** : लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**तूळ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील.

**वृश्चिक** : आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल. मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

**धनु** : व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल. जुन्या मित्रांसोबत वेळ व्यतीत कराल.

**मकर** : सामाजिक क्षेत्रात यश. नवीन कार्य सुरू केल्याने लाभ होईल.

**कुंभ** : अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. वेळेचे महत्व समजेल. घरात मंगल कार्य होतील.

**मीन** : आर्थिक आणि सामाजिक कामांत अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहाल. व्यापारात नवीन करार होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## चोराच्या मनात

गर्भपाताला कायदेशीर मान्यता देण्यासंबंधीचे बिल विधानसभेत चर्चेला यायचे होते. त्या संदर्भात काही सूचना करण्यासाठी एका डॉक्टरने मंत्र्यांना फोन केला. मंत्री दौऱ्यावर होते म्हणून सचिवांनी फोन घेतला. नामदार साहेब परत आल्यावर त्यांना सचिवाने निरोप सांगितला. साहेब त्या गर्भपाताच्या बिलासंबधी डॉक्टरांचा फोन आला होता. मंत्री महोदय ताडकन म्हणाले जरा हळू बोला आणि त्या हरामखोर डॉक्टरला सांगा की, त्याचं बिल आज संध्याकाळच्या आत चुकंत केलं जाईल म्हणून.


# जागतिक आश्चर्ये

## ट्रेजेडी पेंटींग्स्

जगप्रसिद्ध चित्रकार पॅबलो पिकासो याने ट्रॅजिडी हे पेंटींग बनविले होते. ते पुर्णत: ऑईल पेंटींग होते. त्या पेंटींगचा आकार १ हजार मीटर व रुंदी ६०० मीटर एवढा होता.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१


# शब्दगंध क्र. ७०९२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) उभे राहिले असता ज्याचे दोन्ही हात गुडघ्यापर्यंत येतात असा ५) दाट; घन; निबिड ६) भयंकर ७) थोडासा; अल्पसा ९) आपला देश ११) जंगलाचा राजा; सिंह १४) धनुष्याचा जोडीदार; शर १५) अगदी गोल; वाटोळा १७) जंगलाला लागलेली आग; वणवा २०) साथ; सोबत; बरोबर २२) धमनी; शीर; नाडी २३) आकाश; अंबर; नभ

**उभे शब्द :-** १) ध्वनी; साउंड; रव; नाद २) तोटा; घाट; हानी ३) एक सम संख्या; एका तपातील वर्षांची संख्या ४) हुलकावणी; बतावणी; गडबड ५) एक शेंगभाजी ८) लंकेचा दहा तोंडी राजा १०) चलाख ; हुशार; ताजातवाना १२) क्रोध; त्वेष १३) अगदी जख्खड म्हातारा १४) सामान वगैरे ज्यात बांधतात ते कापड किंवा गोणपाट १६) चिंतन, मनन १८) गंध; राहणे १९) वेल; वल्लरी २०) साथ; सोबत; बरोबर २१) भक्त किंवा सेवक यांचा समुदाय

### शब्दगंध क्र. ७०९१ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आयुष्यात प्रत्येक गोष्टीचा फायदा घ्या पण कोणाच्या विश्वासाचा आणि प्रेमाचा नाही.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## भिजवलेले बदाम की सुके बदाम, आरोग्यासाठी काय जास्त फायदेशीर?

बदाम हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात, काही लोक ते भिजवल्यानंतर खातात, तर काहीजण थेट सुके बदाम खातात. बदाम भिजवून खावेत की वाळवून खावेत हे जाणून घेऊया. तज्ज्ञांच्या मते, कोरड्या बदामापेक्षा भिजवलेले बदाम जास्त फायदेशीर आहेत का? असे का होते आणि भिजवलेले बदाम तुमच्या आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरू शकतात हे जाणून घेऊया.

जेव्हा आपण बदाम भिजवतो तेव्हा त्यातील फायटिक ऍसिड कमी होते. फायटिक ऍसिड हे एक विरोधी पोषक तत्व आहे जे शरीरातील इतर पोषक तत्वांचे शोषण करण्यास अडथळा आणते. भिजवलेल्या बदामामध्ये फायटिक ॲसिड कमी असल्याने शरीर पोषकद्रव्ये अधिक सहजपणे शोषून घेण्यास सक्षम असते. भिजवलेले बदाम पचण्यास सोपे असतात कारण भिजवल्याने बदाम मऊ होतात आणि त्यांची साल सहज काढली जाते. त्यामुळे पचनसंस्थेवर कमी भार पडतो.

भिजवल्याने बदामामध्ये असलेले एन्झाईम सक्रिय होतात, ज्यामुळे शरीराला पोषक तत्वांचा अधिक प्रभावीपणे वापर करता येतो. भिजवल्याने बदामातील काही हानिकारक पदार्थ काढून टाकले जातात, ज्यामुळे ते आरोग्यासाठी सुरक्षित होतात.

भिजवलेल्या बदामामध्ये असलेले म नोअनसॅच्युरेटेड फॅट्स हृदयाच्या आरोग्यासाठी खूप चांगले असतात. हे हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात. भिजवलेल्या बदामामध्ये जास्त प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले वाटते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. बदामामध्ये व्हिटॅमिन ई आणि इतर अँटीऑक्सिडंट असतात जे मेंदूच्या आरोग्यासाठी उत्तम असतात. बदामामध्ये व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक घटक असतात जे त्वचा आणि केसांना निरोगी ठेवण्यास मदत करतात.

भिजवलेले बदाम तयार करणे खूप सोपे आहे. फक्त काही बदाम रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा आणि सोलून सकाळी खा. तुम्ही ते नाश्त्यात किंवा स्नॅक्स म्हणून खाऊ शकता. कोरड्या बदामापेक्षा भिजवलेले बदाम जास्त फायदेशीर असतात. याम ध्ये पोषक तत्वांचे अधिक चांगले शोषण होते आणि ते पचण्यासही सोपे असतात. त्यामुळे भिजवलेल्या बदामाचा आहारात समावेश करा.

## किडा आणि त्याचे पोर

एकदा एका किड्याचे पोर आपल्या आईला म्हणाले, 'आई, मला आता दिसू लागलं.' तेव्हा परीक्षा पाहण्यासाठी त्याच्यापुढे एक जायफळ ठेवून त्याची आई म्हणाली, 'अरे, हे काय आहे, बरं.'

पोर म्हणाले, 'आई हा वाटोळा दगड आहे.' हे ऐकून त्याची आई म्हणाली, 'अरे बाळा, तुला दिसू तर लागलं नाहीच पण अजून वासही समजू लागला नाही.'

**तात्पर्य –** माणूस आपले एक व्यंग लपवू पाहतो, पण बऱ्याच वेळा त्याचे दुसरे व्यंगही उघडकीस येते.

# रहमते दर्शन (भाग – १)



मैंने किताब में पाँच शब्द का वर्णन पढ़ा तो महाराज जी से कहा कि मुझे नाम दान नहीं मिला है, उन्होंने कहा कि आप तिलक नगर चले जाओ। वहाँ संत दर्शनसिंह जी आपको नामदान देंगे। मैं तिलक नगर पहुँचा और वहीं पर एक दिन मुझे महाराज दर्शनसिंह जी से नामदान मिला। महाराज जी ने मुझे अलग से बिठाया और विशेष तवज्जोह दी। मुझे विशेष अनुभव हुआ।

### वे मेरे प्राण थे

दूध मेरी एक १३ महीने की बेटी थी। उसकी बाजू पर गर्म गया था। उसे हस्पताल भरती कराया गया। जब बच्ची को आराम नहीं आया, तो ऑपरेशन कराना पड़ा। ऑपरेशन थियेटर के डॉक्टरों ने महाराज जी की मौजूदगी के बारे बताया। डॉक्टरों ने पूछा कि यह सरदार अन्दर कैसे आ गया, तो मैंने फोटो दिखाई तो उन्होंने कहा, हाँ यही हैं। मैंने कहा कि ये तो हमेशा हमारे अंग-संग रहते हैं। यह २१ जनवरी १९७७ की बात है।

मेरी पत्नी ने अस्पताल में ही प्रार्थना की कि यदि तू खुदा है तो १० मिनट में मुझे यहीं पर शरीर रूप में दर्शन दो। महाराज १० मिनट से पहले ही पहुँच गये और मेरी घरवाली से पूछा, बोल क्या बात है? उसने क्षमा याचना करते हुए कहा कि मेरी बच्ची तो दूध भी नहीं पी रही। महाराज जी ने उस लड़की को 'मोहिनी' नाम से पुकारा तो १३ महीने की बच्ची बोल उठी कि हाँ महाराज जी! बच्ची ने माँ का दूध पी लिया। मेरी पत्नी अपने दूसरे बच्चों को देखने घर आ गई। रात ११ बजे बच्ची ने शरीर छोड़ दिया। मुझे शक हुआ कि बच्ची को काल ले गया होगा या दयाल, तो महाराज जी ने मुझे अन्तर में दर्शन दिये और दिलासा दिया। मैंने देखा कि बच्ची महाराज जी के चरणों में है और मैं संतुष्ट हो गया।

### वे विनम्रता के पुंज थे

एक दिन किसी सत्संगी ने मुझे कहा था कि महाराज दर्शनसिंह जी को साँस की तकलीफ़ है। मैंने महाराज जी के लिए चित्रकूट से दवाई मँगा ली जो खीर में मिलाकर खानी पड़ती थी। मैं ड्यूटी से छुट्टी करके जब आश्रम के लिए चला, तो मैं रास्ते में सोच रहा था कि मैं तो सवा छः बजे तक आश्रम में पहुँच जाऊँगा। परन्तु महाराज जी के दर्शन साढ़े आठ से पहले होने मुश्किल हैं। लेकिन जब मैं आश्रम में पहुँचा तो देखकर दंग रह गया कि हुज़ूर बाहर टहल रहे थे। आठ-दस लोग महाराज जी के आस-पास खड़े थे। मैं यह चाहता था कि महाराज जी से एकांत में बात करूँ। अचानक महाराज जी एक खम्बे के पास जा खड़े हुए, बिल्कुल अकेले। मैं झट से महाराज जी के पास पहुँचा और मैंने दवाई की बात की। महाराज जी की आँखें नम हो गईं। और कहने लगे, भाई साहब! अब मुझे दवाई की ज़रूरत नहीं है। आपका बहुत-बहुत शुक्रिया। उन दिनों महाराज जी गैस्ट हाऊस में रहा करते थे।

मुझे माता जी से भी मिलना था और उनसे मुलाकात के लिए मैंने सेवादार को नाम दे रखा था। महाराज जी ऊपर जा चुके थे।

अचानक सेवादार ने मेरा नाम पुकारा। मैं जब ऊपर गया तो महाराज जी ने पूछा कि माता जी से कौन मिलने आया है? मैं सोफे पर बैठा था। महाराज जी नीचे कालीन पर बैठ गये। मुझे बहुत शरम आयी। तभी माता जी भी आ गयीं। मैंने महाराज जी व माता जी से कहा, मैंने संगीत की डिग्री पास की है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

क्रोध, भय, ईर्ष्या, हर्ष, दुःख, चिंता तथा अन्य तीव्र सवेंगो से हृदय तथा अन्य सूक्ष्म आंतरिक अंगो पर असर होता है, जिस से स्मृति नाश होती है। मानसिक असंतुलन से शरीर में सन्तुलन नहीं रहता जिस से स्मृति नाश होती है। किसी बात का याद न रहना ही दर्शाता है कि स्मरण शक्ति कमजोर है। बच्चों को पाठ याद न रहने से फेल हो जाते हैं। व्यापारी की यादाश्त कमजोर होने से व्यापार नष्ट हो जाता है। अधिक मात्रा में नियमित तौर पर तली-भुनी चीजों जैसे समोसा-कचोड़ी, आलूवड़ा, ब्रेडबड़ा, पापड़ आदि का सेवन करने से स्मरण शक्ति कमजोर होती है। फास्टफूड का सेवन दिमाग को कमजोर करता है। इससे एकाग्रता धीरे-धीरे कम होने लगती है, और याददाश्त कमजोर हो जाती है। अधिक मीठा खाने से आपका दिमाग सुस्त पड़ जाता है। यह आपकी तार्किक क्षमता को कम करने का काम करता है। अधिक नमक खाने पर भी यादाश्त शक्ति कमजोर होती है। नमक सोचने समझने की शक्ति को क्षीण करता है। इस लिये सब्जी में जितना जरूरी है उतना ही नमक डालें। इस से क्रोध भी बढ़ता है। स्मरण शक्ति का कमाल

### दिमाग की शक्ती

सभी लौकिक और आलौकिक शक्तियां हमारे दिमाग में बहुत गहरे तल में पड़ी हुई हैं और उन्हें हम भूल गये हैं। इन भूल गई । शक्तियों को बाहर निकालने के लिये हमें विधि खोजनी होगी। लौकिक क्षेत्र में कुछ लोगों ने स्मरण शक्ति के बल से अद्भुत कार्य किए हैं। एक अध्यापक ने किसी एक विषय पर विभिन्न पुस्तकों के २५०० पेज याद कर लिये। एक व्यक्ति ने १६०० मील की यात्रा की और इस दौरन उसने एक विशाल ग्रंथ याद कर लिया।

हम जो याद रखना चाहते हैं, उसके पायंट्स बना लें और कहीं भी आते जाते उन्हें रट लें। एक बच्चे ने ४ वर्ष की आयु में ३००० वस्तुए याद कर ली। एक विद्यार्थी १४ वर्ष की आयु में अंक गणित का प्रोफेसर बना गया। बाद में वह राज्य का मुख्य पादरी बन गया। एक विद्यार्थी अपनी यादाशत के कारण १० वर्ष की आयु में एक विशाल लायब्रेरी का सर्वोच्च अधिकारी बन गया। एक बालक अच्छी स्मृति के कारण इतनी उन्नति कर गया कि १० साल की उम्र में उसने एक विशाल विश्व विद्यालय स्थापित कर दिया। एक बालक ने १० वर्ष की आयु में ९ भाषाएं सीख ली। वही बालक १९ वर्ष की आयु में अपने राज्य के उच्चतम न्यायलय में जज बन गया। एक प्रधान मंत्री अपने राज्य के किसी भी वर्ष का बजट का एक एक अक्षर सुना देता था। एक व्यक्ति ईश्वर की प्रार्थना, बिना अटके, बिना कोई गलती २१५ भाषाओं में सुना सकता था। एक अनपढ़ व्यक्ति ने पूरी बाईबल याद कर ली थी। एक व्यक्ति ने केवल १९ वर्ष की आयु में कानून की डिग्री ले ली। एक लड़की ने १३ वर्ष की उम्र में ३६ पुस्तकों के ३० लाख शब्द रट लिये। एक व्यक्ति ने उल्टी पुस्तक सुना कर अपने को फांसी की सजा से बचा लिया। मनुष्य जीवन में स्मरण शक्ति का बहुत महत्व हैं। कमजोर स्मरण शक्ति एक अभिशाप है। कमजोर स्मरण शक्ति के कारण शिक्षित भी अशिक्षित ही माना जाता है। ऐसी ही दिव्य शक्तियां हमारे दिमाग में बहुत गहरे तल में उपलब्ध हैं वह सिर्फ हमें भूल गई हैं। वह शक्तियां याद कैसे आयें उसकी विधि खोजनी है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

वरील लक्षणे दिसली की, प्रसूतीची वेळ जवळ आली आहे असे समजून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे. प्रसूतिअवस्था सुरू होऊन बाळ गर्भाशय मुखातून बाहेर येऊन जन्म होण्यापर्यंत व बाळाची वार (Placenta) बाहेर पडेपर्यंत प्रसूतीच्या तीन अवस्था असतात.

**१) प्रथम अवस्था :**

या अवस्थेत गर्भवती चालू-फिरू शकते. तिला कळ आल्यामुळे गर्भाशयाचा वरचा भाग आकुंचन पावतो. गर्भाशय मुखाजवळील शिरांवर दाब येतो. गर्भाशयाचा आकुंचन कालावधी दर १५ ते २० मिनिटांचा असतो. गर्भाशयाचे मुख अंदाजे ३ सेंमी. इतके उघडते. प्रथम अवस्थेमध्ये दोन कळांच्यामध्ये मार्जरासन करावे: यामुळे गर्भाशयाचे तोंड उघडण्यास मदत होते. त्यानंतर दर ३-३ मिनिटांनी गर्भाशय आकुंचन पावण्याची क्रिया होते. या वेळी गर्भाशयाचे मुख ६ सेमीं. एवढे उघडते. काही वेळाने प्रथम अवस्थेच्या शेवटी कळा दर २ मिनिटांनी येतात. प्रथम खेप असलेल्या गर्भवती स्त्रियांमध्ये पहिली अवस्था ही १२ ते २४ तास असू शकते, तर दुसरी वा तिसरी खेप असणाऱ्या स्त्रियांमध्ये पहिली अवस्था ही कमी म्हणजे काही तासांपुरतीच असते.

### प्रसूतिअवस्था

**२) द्वितीय अवस्था :**

पहिल्या अवस्थेमध्ये गर्भवती स्त्री ही चालू फिरू शकते; परंतु दुसऱ्या अवस्थेमध्ये गर्भाशयाचे आकुंचन जास्त प्रमाणात होत असल्यामुळे कळा जास्त असतात त्यामुळे स्त्रीला असह्य वेदना होतात; म्हणून या अवस्थेत गर्भवतीला मानसिक आधाराची गरज असते. याच अवस्थेत गर्भवतीने कळ आल्यावर योनीभागाजवळ जोर केल्यास बालकाचे डोके पुढे सरकते; त्यामुळे कळ आल्यावर श्वास रोखून जास्तीत जास्त जोर करावा. कळ संपल्यानंतर खोल श्वासोच्छवास करावा. हात, पाय सपूर्ण शरीर शिथिल करावे; त्यामुळे कळ घेताना थकवा वाटत नाही. कळ नसल्यावर निरर्थक जोर करण्याचा उपयोग होत नाही. बालकाचे डोके योनीजवळ आल्यावर प्रथम खेप असेल व बालकाचे डोके बाहेर पडायला योनीची जागा अरुंद वाटत असेल, तर योनी मार्ग इंजेक्शनद्वारे बधीर करून योनीच्या डाव्या किंवा उजव्या बाजूला योनी मार्गावर छेद करतात; त्यामुळे योनीमार्ग रुंद होऊन बाळाचे डोके सहजपणे बाहेर येऊ शकते. दुसऱ्या अवस्थेच्या सुरुवातीला गर्भावरण फाटून थोडे गर्भोदक बाहेर येते. बाळ योनीतून बाहेर पडते. ते बाहर पडल्यानंतर त्याच्या नाकात, तोंडात, श्वासनलिकेत गर्भोदक असल्यास साफ केले जाते. जन्म झाल्याबरोबरच बाळ रडलेले चांगले असते. ५ मिनिटांच्या आत बाळ रडले नाही, तर बाळामध्ये वैगुण्य येण्याची शक्यता असते. त्यासाठी डॉक्टर बाळ रडण्यासाठी प्रयत्न करतात.

**तृतीय अवस्था :** प्रसूतीनंतर बाळ बाहेर आल्याने गर्भाशयाचे आकुंचन बंद होते. प्रसवक्रियेमध्ये गर्भाशयाचे स्नायू थकलेले असतात; त्यामुळे प्रसूतीनंतर गर्भाशयाचे आकुंचन बंद होऊन १५ ते २० मिनिटे ते स्नायू आराम स्थितीत असतात. ही आकुंचने कमी तीव्रतेची असतात. साधारणतः बाळाच्या जन्मानंतर अपरा (Placenta) अर्ध्या तासामध्ये बाहेर पडते. अपरा बाहेर पडल्यावर योनीभागात छेद घेतला असेल, तर तो व्यवस्थित शिवतात. यालाच आधुनिकशास्त्रात इपिझिओटॉमी असे म्हणतात. या अवस्थेमध्ये स्त्रीचा रक्तस्राव कमी झाला आहे की नाही हे बघून घ्यावे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात सामूहिक शंखनाद आणि घंटानादात श्रीराम लल्ला वर्षपूर्ती सोहळा उत्साहात

नगर– अयोध्या येथील श्री राम लल्ला मंदिरास वर्षपूर्ती झाल्या निमित्ताने नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मंदिरास फुलाची आकर्षक सजावट तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आले. पाच दिवसापासून रोज वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता सामूहिक शं खनादाने करण्यात आली. या शंखनादाने व घंटानादाने संपूर्ण परिसरात एक प्रसन्न असे वातावरण तयार झाले होते.


नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम लल्ला वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त सामूहिक शंखनाद करताना भाविक.

नवी पेठ येथील श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी सोहळ्यानिमित्त मंगळवार दि.७ रोजी अखंड २४ तास श्रीराम जय राम जय जय राम या तारक मंत्राचे नामस्मरणरुपी संगीत अनुष्ठान संपन्न झाले या जपात भाविक भक्ती भवानी तल्लीन झाले. बुधवार दि.८ रोजी भक्तीरंग प्रस्तुत रामायणाचार्य श्री. गोरक्षनाथजी दुतारे महाराज (मुंबई दुरदर्शन कलाकार) यांची श्रीराम भजन सेवा (भजन संध्या) कार्यक्रम घेण्यात आला. गुरुवार दि. ९ रोजी प.पु. स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांचे कृपापात्र शिष्य पं. श्री.गिरीराजजी व्यास (पुणे निवासी) यांचे सुमधुर वाणीत श्री संगीतमय सुंदरकांड (भक्तीमय संगीत कार्यक्रम) भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शुक्रवार दि. १० रोजी सुप्रसिध्द पं. राजेंद्र शर्मा (रामवाला) – प्रसिध्द गायक सी.ए. सागर शर्मा (नागपुर निवासी) ह्यांचा श्रीराम – हनुमान महिमा वर आधारित एक शाम प्रभु श्रीराम के नाम हा कार्यक्रम अतिशय भक्तीमय वातावरणात पार पडला.

शनिवार दि.११ रोजी श्रीरामलल्ला प्रतिष्ठा व्दादशी सोहळ्यानिमित्त सामुहिक महा हनुमान चालिसा पठण व महाआरती दरम्यान सामुहिक भव्य शंखनाद व घंटानाद कार्यक्रम अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये आणि भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तसेच संध्याकाळी महाआरती व ढोलपथकाचे स्थीर वादन झाले. प्रत्येक कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप देखील करण्यात आले.

अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये भाविकांच्या उपस्थितीत हा प्रतिष्ठा द्वादशी सोहळा संपन्न झाला. हा सोहळा यशस्वीतेसाठी श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट अध्यक्ष प्रितम मुथ्था, उपाध्यक्ष निखिल शेटीया सर्व ट्रस्टी व सेवेकरींनी मिळून मिसळून सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# आय.एम.एस. आयोजित 'वाचन संकल्प महाराष्ट्र' उपक्रमांतर्गत 'पुस्तक परीक्षण स्पर्धे'ला प्रतिसाद

नगर – मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधून आणि राज्यातील वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राज्य सरकारच्या उच्च तंत्र शिक्षण विभागाने जानेवारी महिन्यातील पहिल्या १५ दिवसांत 'वाचन संकल्प महाराष्ट्र' हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमांतर्गत आय.एम.एस. संस्थेने पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेचा मुख्य उद्दिष्ट तरुण पिढीला वाचन आणि ग्रंथांकडे आकर्षित करणे आणि ग्रंथालयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीला वाव देणे हे होते.

उपक्रमाचे महत्त्व सांगताना संचालक डॉ. एम .बी. मेहता यांनी मार्गदर्शन केले, तर उप–संचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी वाचन संकल्प उपक्रमाची व्यापक प्रसिद्धी, पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन, समितीचे गठन आणि उपक्रमाचे वेळापत्रक यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला, आणि परीक्षण निबंध मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये सादर करण्यात आले. व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे यांनी स्पर्धेतील प्रवेशिका मूल्यांकन करून तीन प्रमुख विजेते आणि दोन उत्तेजनार्थक पारितोषिक विजेते जाहीर केले.

आय.एम.एस. संस्थेने 'वाचन संकल्प महाराष्ट्र' उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या पुस्तक परीक्षण स्पर्धेचा समारोप नुकताच झाला. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे होता. स्पर्धेचे प्रमुख विजेते प्रा. गौरी पाटील (संशोधन विद्यार्थी) यांना प्रथम पारितोषिक मिळाले. द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले असून ते ज्ञानेश्वर एन. गुलगे (एम.बी.ए. २) आणि मनीष आर. पगिरे यांना मिळाले. कु.अनुष्का ए. चौरे (एम.बी.ए. १) आणि कु.सिद्धी पी. गांधी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.या उपक्रमाने विद्यार्थ्यांना साहित्यिक वाचनाच्या कलेला प्रोत्साहन दिले असून, त्यांच्या लेखन कौशल्यात महत्त्वपूर्ण वृद्धी केली आहे. हे उपक्रम आपल्या वाचन संस्कृतीला पुढे घेऊन जाण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक, उपसंचालक, व्यवस्थापन विभाग प्रमुख, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस, तसेच ग्रंथालय कर्मचारी जितिन आढाव, सिराज मुलानी, कृष्णकुमारी थोरें आणि राजेश कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली.


बाणेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय स्वयंसेवकांनी गोरक्षनाथ गडाची स्वच्छता केली.

# बाणेश्वर महाविद्यालयातील एनएसएसच्या स्वयंसेवकांकडून गोरक्षनाथ गडाची स्वच्छता

नगर – श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे मांजरसुंबा येथे राबविण्यात येत आहे. यादरम्यान दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी पाचव्या दिवशी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियान राबविले.

या दरम्यान स्वयंसेवकांनी श्री गोरक्षनाथ मंदिर या धार्मिक स्थळाचा परिसर व मंदिराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. त्यामध्ये प्लास्टिक कचरा, पालापाचोळा व मंदिराच्या सार्वजनिक पाणी पिण्याचे ठिकाणाची स्वच्छता केली. तसेच प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवरचा कचरा साफ केला. व गडावरील सर्व प्लास्टिक बॉटल गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली. हे स्वच्छता अभियान राबविण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आ. शिवाजीराव कर्डिले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव व मांजरसुंबा गावच्या सरपंच रूपालीताई कदम, उपसरपंच जालिंदर कदम, यांचे सहकार्य लाभले. अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. सागर कोहक, डॉ.स्वाती वाघ, प्रा.विठ्ठल कडूस, प्रा.पुनम राऊत व रासेयोचे स्वयंसेवक यांनी कष्ट घेतले.

# बँक मित्रांच्या प्रश्नांची त्वरित सोडवणूक करा

**महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनचे स्टेट लेव्हल बँकर्स कमिटीला निवेदन**

नगर – कोरोना काळात अविरत बँकिंग सेवा देण्यात, किसान कल्याण, गरीब कल्याण योजनेखाली सरकारी मदत गरीब जनतेपर्यंत पोहचविण्यात महत्त्वाची भूमिका घेतलेल्या बँक मित्रांच्या प्रश्नांची त्वरित सोडवणूक करण्याच्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या वतीने स्टेट लेव्हल बँकर्स कमिटीला देण्यात आले आहे. कंत्राटी पध्दती, कमी करण्यात आलेले कमिशन आणि वेळेवर मिळत नसलेल्या कमिशनच्या प्रश्नासंदर्भात मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, रिझर्व्ह बँक, नाबार्ड, राज्य सरकारचे सहकार खाते जे राज्य सरकारच्या वतीने स्टेट लेव्हल बँकर्सशी समन्वयाचे काम करते यांचे लक्ष वेधण्यात आले असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष देविदास तुळजापूरकर व सचिव दिपक पाटील यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्यात सध्या २.४६ लाख बँक मित्र काम करतात, ज्यातील २२ हजार बँक मित्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या वतीने काम करतात. या बँक मित्रांनी ३.४६ कोटी जनधन खाती उघडण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. या जनधन खात्यांमध्ये आज शिल्लक रक्कम आहे १४,३१५ कोटी रुपये! या खात्यातील ८८.७९ लाख खाती, आधार कार्डाशी जोडण्यात आली आहेत, तर २.३८ कोटी खातेदारांना रूपे कार्ड देण्यात आली आहेत.

याशिवाय या बँक मित्रांनी १.३८ कोटी आणि ३.१७ कोटी खातेदारांना जीवन ज्योती आणि जीवन सुरक्षा योजनेचे विमा कवच उपलब्ध करून देण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. या बरोबरच त्यांनी १.३७ कोटी खातेदारांना अटल पेन्शन योजनेचे सभासद करून घेतले आहे. करोना काळात अविरत बँकिंग सेवा देण्यात, किसान कल्याण, गरीब कल्याण योजनेखाली सरकारी मदत गरीब जनतेपर्यंत पोहचविण्यात बँक मित्रांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. गरीब जनतेसाठी बँक मित्र जीवनवाहिनी बनले असल्याचे महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

हे सर्व बँक मित्र सुरवातीला प्रत्यक्ष बँकेशी करार करून त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करत असत, पण आता बँका कार्पोरेट एजन्सीच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीवर त्यांची नेमणूक करत आहेत. यात त्यांना मिळणाऱ्या कमिशन मधे खूप कपात करण्यात आली आहे. हे तुटपुंजे कमिशनही वेळेवर देण्यात येत नाही. त्याचा दर मनमानी पद्धतीने निश्चित केला जातो. अनेक जास्तीची कामे विनामोबदला करून घेतली जातात. त्यांना नियुक्ती पत्र, शर्ती (अटी) बाबतचे पत्र दिले जात नाही. यामुळे या बँक मित्रांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

नुकतेच महाराष्ट्र राज्यातील बँक मित्रांनी पुढाकार घेऊन एआयबीइएशी संलग्न संघटना स्थापन केली आहे. या संघटनेच्या वतीने स्टेट लेव्हल बँकर्स कमिटीला एका पत्राद्वारे असे आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या परिस्थितीत हस्तक्षेप करून बँक मित्रांच्या प्रश्नांची त्वरित सोडवणूक करावी, अन्यथा ही व्यवस्था कोलमडेल. सामान्य माणसाचे बँकिंग अडचणीत येणार असल्याचे म्हंटले आहे.

संघटनेच्या वतीने सर्व जिल्हा प्रतिनिधींची एक सभा फेब्रुवारी महिन्यात पुणे येथे घेण्यात येत आहे, ज्यात बँक मित्रांच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात येईल आणि पुढील दिशा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# अभिरुप न्यायालयाच्या माध्यमातून व्यवसायीक आणि समाजाभिमुख वकिल घडण्याचे महत्वपूर्ण कार्य होते

**न्यायमुर्ती ए. आर. पेडणेकर**

नगर – विधी महाविद्यालयात अभिरुप न्यायालयाचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायाची विविध कौशल्ये आत्मसात करुन कायदयातील विसंगती, त्रुटी आणि बारकावे या कायदे क्षेत्रातील महत्वाच्याबाबींचे ज्ञान प्राप्त होते. तसेच वकिलांनी न्यायालया पुढे उभे राहताना पूर्ण तयारीनिशी आणि खटल्याचा सखोल अभ्यास करुनच उभे रहावे. अभिरुप न्यायालयाच्या माध्यमातून व्यवसायीक आणि समाजाभिमुख वकिल घडण्याचे महत्वपूर्ण कार्य होते, असे प्रतिपादन उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमुर्ती ए. आर. पेडणेकर यांनी केले. येथील न्यू लॉ कॉलेज आयोजित सातव्या के. एस. बी. म्हसे पा. सातव्या राज्यस्तरीय अभिरुप न्यायालय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



न्यू लॉ कॉलेज आयोजित सातव्या के. एस. बी. म्हसे पाटील सातव्या राज्यस्तरीय अभिरुप न्यायालय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमुर्ती ए. आर. पेडणेकर. (छाया – समीर मन्यार)

स्पर्धेचे उद्घाटन दिपप्रज्वलन करुन कै. न्यायमुर्ती एस. बी. म्हसे पा. यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे, सहसचिव जयंत वाघ, प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे, कार्यकारणी सदस्य दिपक दरे, अ‍ॅड. माणिक मोरे, सौ. अलका जंगले, सौ. अरुणा काळे, प्रा. अशोक चौधरी, अ‍ॅड. खडे, अ‍ॅड. सुभाष भोर, जिल्हा सरकारी वकिल अ‍ॅड. सतिश पाटील, प्राचार्य डॉ. एम.एम. तांबे, स्पर्धेचे समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे हे होते.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेऊन न्यायमूर्ती एस. बी. म्हसे यांच्या नावाने महाविद्यालयाने अभिरुप स्पर्धा सुरु केली असून न्यायमूर्ती म्हसे यांच्या कार्याचा व संस्थेसाठी योगदानाबद्दल कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अ‍ॅड. माधवेश्वरी म्हसे यांनी गत सहा स्पर्धांचा आढावा घेऊन दिवसेंदिवस स्पर्धेचा आलेख वाढता असल्याचे सांगून म्हसे साहेबांच्या विधी क्षेत्रातील अनमोल योगदानाचा उल्लेख केला.

स्पर्धेचे परीक्षक अ‍ॅड. अमरजितसिंग गिरासे, अ‍ॅड. अविनाश बोरुळकर, अ‍ॅड. प्रसन्न चव्हाण, अ‍ॅड. निलेश घाणेकर, अ‍ॅड. सिध्देश्वर ठोबरे, अ‍ॅड. प्रमोद पाटणी हे काम पाहणार आहेत. यावेळी राज्यभरातून स्पर्धेसाठी विधी महाविद्यालयाचे एकूण २४ संघ सहभागी झालेले आहेत. पाहुण्यांची ओळख प्रा. सुहास तोरडमल यांनी तर आभार डॉ. बी. डी. पांढरे यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे यांनी केले.

यशस्वीतेसाठी अधिक्षक हेमा कदम, प्रा. गिरिष हिरडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी परिश्रम घेत आहेत.


पंचवटीनगर श्रीराम मंदिर येथे श्रीमद् भागवत कथा कथन करताना ह.भ.प. मंदारबुवा रामदासी (छाया – लहू दळवी)

# जीवनात भागवत कथेचे स्मरण श्रद्धेने केले तर मानवाचा उद्धार होतो

**ह.भ.प. मंदारबुवा रामदासी यांचे प्रतिपादन**

नगर – श्रीमद् भागवताच्या महात्म्यात श्री नारदजी सांगतात की, जेव्हा मनुष्याच्या अनेक जन्मातील केलेल्या पुण्याचा उदय होतो तेव्हा त्याला सत्संग प्राप्त होतो, सत्संगामुळे आपल्या जीवनातील दुःखाला कारण असणारे अज्ञान आणि अज्ञानामुळे निर्माण होणारे मोहोळ मद इत्यादी विकार नाहीसे होतात, सत्संगामुळे बुद्धीत विवेकाचा उदय होतो आणि विवेकाने मनुष्य सुखी होतो असा दुर्लक्ष सत्संग आपणास कथा श्रवणाच्या निमित्ताने प्राप्त होत आहे. भागवत कथेचे सामर्थ्य महान असून मनुष्याने आपल्या जीवनामध्ये कथेचे स्मरण श्रद्धेने करावे तर नक्कीच उद्धार होतो, असे प्रतिपादन हभप मंदारबुवा रामदासी यांनी केले.

पंचवटीनगर श्रीराम मंदिर येथे बाळासाहेब बारस्कर परिवाराच्यावतीने पौष मासनिमित्त श्रीमद् भागवत कथेला प्रारंभ झाला. यावेळी ह.भ.प. मंदार बुवा रामदासी, माजी नगरसेविका दिपाली बारस्कर, शारदा ढवण, माजी नगरसेवक सतीश बारस्कर, सचिन बारस्कर, अनिल ढवण आदीसह श्रोते उपस्थित होते.

श्रीमद् भागवत कथेतून समाज समृद्ध होण्यासाठी मदत होत असते, धार्मिक कार्यक्रमातून समाज एकवटला जातो त्या माध्यमातून चांगल्या विचारांची देवाण–घेवाण होते, आपल्या संस्कृतीचे जतन होत चांगल्या विचारांची पिढी निर्माण होते, श्रीमद् भागवत कथेच्या शुभारंभप्रसंगी पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भक्तगण उपस्थित होते. ह.भ.प. मंदार बुवा रामदासी यांच्या मधुर वाणीतून कथा सप्ताह कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्रोत्यांनी याचा लाभ घ्यावा तसेच महाप्रसादाचे आयोजन देखील केले जाते, अशी माहिती माजी नगरसेविका दिपाली बारस्कर यांनी दिली.

# उच्च शिक्षण आणि विदेशातील करिअर संधी यावर अहिल्यानगर येथे २५ जानेवारीला मोफत सेमिनार

नगर – स्टडी स्मार्टच्यावतीने २५ जानेवारी रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत अर्थ रेस्टॉरंट, बॅन्क्वेट हॉल, जीसीएम टॉवर, अहिल्यानगर येथे उच्च शिक्षण आणि विदेशातील करिअर संधी या विषयावर विशेष सेमिनार आयोजित करण्यात आले आहे. याचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विदेशातील शिक्षणासाठी लागणारी महत्त्वाची माहिती आणि मार्गदर्शन प्रदान करणे आहे. हा सेमिनार पूर्णपणे मोफत असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन यांनी दिली.

चेतन जैन म्हणाले, यामध्ये विद्यार्थ्यांना आणि पालकांना स्टडी स्मार्ट च्या तज्ज्ञ मार्गदर्शनातून विविध देशातील उच्च शिक्षणाच्या संधी आणि प्रवेश प्रक्रियेबद्दल माहिती मिळवता येईल. यामध्ये इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड, दुबई आणि इतर प्रमुख देशांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या दृष्टीने सर्वोत्तम पर्याय निवडण्यास मदत केली जाईल.

या सेमिनारमध्ये आयईएलटीएस मास्टरक्लास म्हणजेच ब्रिटिश कौन्सिल आणि कॅम्ब्रिज प्रमाणित ट्रेनर कडून, ज्यामध्ये एक मॉक टेस्ट देखील आयोजित केली जाईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा तयारीचे मूल्यांकन होईल. याशिवाय विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची थेट उत्तरे मिळवण्यासाठी प्रमाणित सल्लागारांसोबत संवाद. यामध्ये पार्ट–टाइम नोकरी, निवास व्यवस्था, शिष्यवृत्ती आणि वित्तीय संधी यावर सखोल चर्चा केली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना विदेशातील संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक अर्ज आणि शिष्यवृत्त्या मिळवण्याबाबत मार्गदर्शन मोफत मिळणार आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी नावनोंदणी आवश्यक असून, https://bit.ly/4aaGlpU या लिंकवर क्लिक करा किंवा ९९७०५७९६३७ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# शिवसेनेच्या माध्यमातून प्रभागातील सर्व विकासकामे मार्गी लागणार

**सुवर्णाताई जाधव यांचे प्रतिपादन; काटवन खंडोबा रोड येथील गाझीनगर परिसरात ड्रेनेजलाईनच्या कामाला प्रारंभ**

नगर – प्रभागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्न राहिला आहे. निधी अभावी प्रभागातील कामे प्रलंबीत होती. महायुतीच्या सरकारमध्ये असलेल्या शिवसेनेच्या माध्यमातून प्रभागातील सर्व विकास कामे मार्गी लागणार आहे. गाझीनगर परिसरात मागील काही वर्षापासून असलेली ड्रेनेज लाईनची समस्या सोडविण्यासाठी काम हाती घेण्यात आले आहे. लवकरच या भागातील काँक्रिटीकरण रस्ता व इतर नागरी प्रश्न देखील सोडविले जाणार असल्याचे आश्वासन नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांनी दिले.


काटवन खंडोबा रोड येथील गाझीनगर परिसरात ड्रेनेजलाईन कामाचा प्रारंभ करताना नगरसेविका सुवणाताई जाधव.

काटवन खंडोबा रोड, गाझीनगर येथे नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांच्या प्रयत्नाने ४५० एमएम व्यासच्या ड्रेनेजलाईन टाकण्याच्या कामाचे शुभारंभ करण्यात आले. यावेळी जाधव बोलत होत्या. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अनिल शिंदे, दिपक खैरे, प्रशांत गायकवाड, दत्ता जाधव, हजराबी शेख, हसिना शेख, सकिना शेख, कमल दातरंगे, शमीम सय्यद, कमल इंगळे, कौसर पठाण, परवीन बागवान, ताराबाई सुडके, विकास पाचारणे, सुनिल सुडके, अरबाज बागवान, अजीज सय्यद, हिराबाई पाचारणे, शाईन शेख, अकबर शेख, अज्जू शेख, शौकत शेख, नजीर पठाण, मुदस्सर शेख आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अनिल शिंदे म्हणाले की, प्रभागातील सदर परिसरात नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांनी विविध प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते सत्तेच्या प्रवाहात आले असल्याने अनेक प्रलंबीत विकास कामे मार्गी लागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नगरसेवक दिपक खैरे व प्रशांत गायकवाड यांनी सर्व नगरसेवक एकत्रित येऊन प्रभागातील विविध प्रश्न सोडविण्याचे काम करत असल्याची माहिती दिली.

गाझीनगर परिसरात काही वर्षांपासून सतत ड्रेनेजलाईन तुंबत असल्याने नागरिकांना दुर्गंधी, नळाद्वारे घाण पाणी येणे व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. या प्रश्नाची दखल घेऊन तातडीने २० लाख रुपये खर्च करुन ४५० एमएम व्यासच्या ड्रेनेजलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

नागरिकांनी सुरु झालेल्या ड्रेनेजलाईनच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केला आहे.

# अर्थजगत

## तीव्र घसरणीचे संकेत

भारतीय शेअर बाजारासाठी नवीन वर्षाची सुरुवात ही कमालीची नकारात्मक ठरली आहे. जानेवारी २०२५ मधील दुसरा आठवडा तर गुंतवणूकदारांमध्ये भीती पसरवणारा ठरला आहे. या सप्ताहात जवळपास सर्वच निर्देशांकांनी दोन महिन्यांतील सर्वात वाईट कामगिरी नोंदवली. या निर्देशांकांमध्ये एका आठवड्याभरात ३-६ टक्क्यांनी घट झाली



आहे. जागतिक बाजारातून येणारे संमिश्र संकेत, डॉलरची बळकटी आणि रुपयाच्या गटांगळ्या, तिसऱ्या तिमाहीतील कॉर्पोरेट कमाईच्या अंदाजांमधून निर्माण झालेली साशंकता, कच्च्या तेलाच्या भावांनी घेतलेली जबरदस्त आणि अनपेक्षित उसळी, भारताच्या आर्थिक विकास दराबाबतची चिंता आदी कारणांमुळे भारतीय शेअर बाजारात विक्रीची त्सुनामी दिसून आली. गेल्या आठवड्यात बीएसई सेन्सेक्स १,८४४.२ अंकांनी म्हणजेच २.३२ टक्क्यांनी घसरून ७७,३७८.९१ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ५७३.२५ अंकांनी म्हणजेच २.३८ टक्क्यांनी घसरून २३,४३१.५० वर बंद झाला. बीएसई लार्ज-कॅप निर्देशांक ३.२ टक्क्यांनी घसरला. बाजाराला सर्वाधिक धक्का दिला मिडकॅप निर्देशांक आणि स्मॉलकॅप इंडेक्सनी. या दोन्ही निर्देशांकांमध्ये अनुक्रमे ५.७ते ६ टक्के घसरण झाली आहे. क्षेत्रनिहाय निर्देशांकांपैकी फक्त बीएसई आयटी निर्देशांकाने १ टक्क्यांची वाढ नोंदवली. इतर सर्व निर्देशांक लाल निशाण फडकावत बंद झाले. ऊर्जाक्षेत्राचा निर्देशांक तर जवळपास ९ टक्क्यांनी आणि बीएसई रियल्टी निर्देशांक ७ टक्क्यांहून अधिक घसरला. पीएसयू इंडेक्सनेही ७ टक्क्यांची घसरण नोंदवली आहे. एका आठवड्यात बाजाराचे एकूण भांडवल२० लाख कोटींनी घटले आहे.

विदेशी संस्थागत गुंतवणूकदार (एफआयआय) तर गेल्या आठवड्यात एखाद्या युद्धामध्ये आकाशातून तोफगोळे पडावेत अशा प्रकारे विक्रीचा मारा करताना दिसले. एका आठवड्यात १६,८५४.२५ कोटी रुपयांच्या समभागांची भरभक्कम विक्री एफआयआयकडून झाली आहे. याउलट देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी २१,६८२.७६ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली निफ्टी आणि आयटी क्षेत्रातील प्रमुख कंपनी असणाऱ्या टीसीएसच्या तिमाही निकालांनंतर आयटी निर्देशांक वधारल्यामुळे बाजाराला थोडा फार तरी आधार मिळाला; अन्यथा याहून मोठी घसरण झाली असती.

स्मॉल कॅप निर्देशांकातील काही समभागांमध्ये १५ ते २३ टक्क्यांची घसरण पाच सत्रांत झाली आहे. अनेक दिवसांनी प्रथमच निफ्टी ५० निर्देशांक २३,५०० च्या खाली बंद झाला आहे. त्यामुळे बाजारावर मंदीवाल्यांचा दबाव सातत्याने वाढत आहे. रुपयाच्या घसरणीमुळे भारताची आर्थिक तूट वाढली आहे. दुसरीकडे अमेरिकन बाँड यिल्डमध्ये वाढ झाल्याने डॉलर आणखी वधारत चालला आहे. याचा भारतीय शेअर बाजारावर दबाव येत आहे. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २० जानेवारी रोजी पदभार स्वीकारणार आहेत. त्यांच्या व्यापार आणि टॅरिफ धोरणांबाबत अनिश्चितता कायम असल्यामुळे जगभरातील गुंतवणूकदार सावध झाले आहेत. सीएनएनच्या रिपोर्टनुसार, ट्रम्प जागतिक आयातीवर १० टक्के आणि चिनी वस्तूंवर सुमारे ६० टक्के शुल्क लावू शकतात. तसेच, या कर्तव्यांचे समर्थन करण्यासाठी ते राष्ट्रीय आर्थिक आणीबाणीही घोषित करू शकतात. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या अधिकाऱ्यांचे मत आहे की यामुळे अमेरिकेत महागाईशी संबंधित चिंता पुन्हा वाढू शकते. याचा परिणाम म्हणजे फेडरल रिझर्व्हकडून आक्रमक व्याजदरकपातीची अपेक्षा कमी झाली आहे. २०२५ मध्ये केवळ पाव टक्क्यांची कपात एकदाच केली जाईल असा अंदाज वर्तवला जात आहे.

**वेध बाजाराचा**

टेक्निकल चार्ट पाहिल्यास, निफ्टीने वीकली चार्टवर बेअरीश पॅटर्न तयार केला आहे. याचा अर्थ येणाऱ्या काळात आणखी घसरण बाजारात दिसू शकते. निफ्टीसाठी आता २३५२० हीच पहिली अडथळा पातळी असेल. ती पार करण्यात अपयश आल्यास बाजार आणखी खाली घसरून २३ हजार ते २२८०० पर्यंत जाऊ शकतो. याउलट या पातळीवर खरेदीचा जोर दिसून आला आणि २३६९० चा टप्पा निफ्टीला ओलांडून स्थिरावता आले तर २४ हजारांच्या दिशेने वाटचाल सुरू होऊ शकते. पण या आठवड्यात तरी हे अशक्य दिसते. कारण शुक्रवारी गिफ्ट निफ्टीमध्ये १८५ अंकांची भरभक्कम घसरण झाली आहे. याचाच अर्थ सोमवारी पुन्हा बाजाराची सुरुवात घसरणीने होण्याची शक्यता आहे. निफ्टी ५०० मधील ३१६ समभाग म्हणजेच ६३ टक्के समभाग हे २०० मूव्हिंग ॲव्हरेजच्या खाली घसरले आहेत. यामध्ये निफ्टी-५० मधील ३१ समभागांचा समावेश आहे.

शनिवारी आलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेचे मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी रशियाकडून होणाऱ्या तेल व नैसर्गिक गॅसच्या निर्यातीवर आणखी निर्बंध घातले आहेत. यामुळे जागतिक बाजारात तेल व गॅसच्या किमती आणखी वधारणार आहेत. साहजिकच याचा फटका पुन्हा भारतासह अन्य देशांना बसणार आहे. कारण तेलखरेदीसाठी जास्त डॉलर मोजावे लागणार आहेत. यामुळे आर्थिक तूट पुन्हा वाढणार आहे. रशियाकडून भारत व चीनला होणाऱ्या तेलाच्या निर्यातीवरही अमेरिकेची वक्रदृष्टी पडली आहे.

एकंदरीत पाहता, सध्याचे वातावरण हे जागतिक व भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मकतेचे नाहीये. परिणामी बाजारावरही याचे नकारात्मक परिणाम दिसणार आहेत. अशा काळात संयमी राहून आपल्या जोखीम क्षमतेनुसार समभागांची खरेदी करता येईल. ऑप्शन किंवा इंट्राडे करणाऱ्या रिटेल ट्रेडर्सनी तर सध्याची पडझड आणि जागतिक पटलावरची अस्थिरता कमी होईपर्यंत बाजारापासून दूर राहणेच योग्य ठरणार आहे.

◆◆◆



## मालमत्तेतील अप्रत्यक्ष गुंतवणुकीचा ‘स्मार्ट पर्याय’



*मालमत्तेतील गुंतवणूक करत चांगला फायदा मिळवण्याचे प्रत्येकाचे स्वप्न असते. परंतु प्रत्यक्षपणे मालमत्तेत गुंतवणूक करत नफा कमाविण्याची क्षमता प्रत्येकातच असते असे नाही. मात्र गेल्या काही वर्षांत मालमत्तेत गुंतवणूक करत नफा कमाविण्याचा ‘अप्रत्यक्ष मालमत्ता गुंतवणुकी’चा एक नवा पर्याय समोर आला आहे. तुम्ही अप्रत्यक्षपणे मालमत्तेत गुंतवणूक करत चांगला परतावा घेऊ शकता, यासाठी जादा रक्कमेची देखील गरज भासत नाही.*

मालमत्तेत गुंतवणूक करत फायदा मिळवण्यासाठी अधिक भांडवलाची गरज भासते. एखाद्याकडे चार पाच लाख रुपये असतील आणि तो मालमत्तेत गुंतवणूक करत दोन चार लाख रुपये कमाविण्याचा इरादा बाळगून असेल तर ते आजच्या काळात शक्य नाही. मात्र कमी भांडवलातही मालमत्तेत गुंतवणूक करत चांगला फायदा मिळवण्याचा एक मार्ग नव्याने विकसित झाला आहे. काही वर्षांपूर्वी मालमत्तेतील गुंतवणूक ही साधारणपणे घर, फ्लॅट किंवा जमीन खरेदीपुरतीच मर्यादित होती. अर्थात प्रत्येक गुंतवणूकदारांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसे नसतात आणि प्रत्यक्ष मालमत्तेत गुंतवणुकीची जोखमीही अधिक राहते. अशावेळी मालमत्तेत अप्रत्यक्षपणे गुंतवणूक करण्याचा एक सोपा आणि सुलभ मार्ग निर्माण झाला आहे. यास रिअल इस्टेट इन्वेस्टमेंट ट्रस्ट (आरईआयटी) असे म्हटले जाते. यानुसार मालमत्ता क्षेत्राशी संबंधित कंपन्यांचे शेअर, बाँड किंवा मालमत्ता निर्देशांकात गुंतवणूक करता येऊ शकते. हा मार्ग गुंतवणुकदारांना कमी भांडवलासह मालमत्ता बाजारात सहभागी होण्याची संधी प्रदान करतो. त्याचबरोबर हा मार्ग नफा किंवा लाभांशाच्या रुपाने गुंतवणुकदारांना चांगला परतावा देखील देतो.

**मालमत्तेतील अप्रत्यक्ष गुंतवणुकीचे लाभ :** अप्रत्यक्ष गुंतवणुकीचे अनेक फायदे आहेत. सर्वात मोठा फायदा म्हणजे यात प्रारंभी भांडवल कमी लागते. एकीकडे प्रत्यक्ष मालमत्ता खरेदी करण्यासाठी कोट्यावधी रुपये लागत असताना ‘रीट’ (आरईआयटी) किंवा मालमत्ता शेअरमध्ये पाच हजारांपेक्षा कमी पैशातून सुरुवात करता येऊ शकते. शिवाय यात लिक्विडीटी अधिक राहते. शेअर बाजारात सहजपणे खरेदी विक्री करता येऊ शकते. दुसरीकडे मालमत्ता विकताना अधिक वेळ आणि खर्च लागू शकतो. पण ‘रीट’ पद्धतीत गुंतवणुकदार हे आपले आर्थिक ध्येय चांगल्या मार्गाने हाताळू शकतात. शिवाय या माध्यमातून मालमत्तेतील गुंतवणुकीची जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने देखील पावले टाकता येतात.

**गुंतवणूक**

**देखभालीच्या खर्चाची चिंता नाही :** साहजिकच मालमत्तेची देखभाल किंवा डागडुजीच्या नावावर दरवर्षी बऱ्यापैकी पैसे खर्च होतात. प्लंबिंग, रंगकाम, इलेक्ट्रिकची कामे आदी. मात्र अप्रत्यक्ष मालमत्ता गुंतवणुकीचा पर्याय हा मालमत्तेकडे लक्ष देणे आणि देखभालीच्या दबावातून मुक्त ठेवतो.अप्रत्यक्ष गुंतवणुकीत मालमत्तेच्या देखभालीची प्रत्यक्ष जबाबदारी ही व्यावसायिक कंपन्यांवर असते आणि त्यामुळे गुंतवणूकदारांना दररोजच्या कटकटीपासून मुक्तता मिळते. शिवाय अप्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे तुम्ही पोर्टफोलिओत वैविध्यपणा देखील आणू शकता. विविध क्षेत्रात आणि मालमत्ता प्रकल्पांत गुंतवणुक करत तुम्ही जोखीम संतुलित करू शकतात. हा मार्ग मालमत्ता बाजाराच्या अस्थिरतेपासून बचाव करण्यासाठी चांगला आहे. त्याचवेळी नव्या गुंतवणूकदारासाठी ही एकप्रकारे शिकण्याची संधी देते. कारण लहान रक्कमेच्या गुंतवणुकीतूनच बाजाराचा मूड अणि व्यवस्था समजण्यास मदत मिळते.

**खबरदारी आणि जोखमीचे व्यवस्थापन :** अर्थात अप्रत्यक्ष रुपाने मालमत्तेतील गुंतवणूक देखील जोखमीची असते. शेअर बाजारातील अस्थिरतेमुळे गुंतवणुकदारांना नुकसान देखील होऊ शकते. त्यामुळे बाजाराचा संपूर्ण अभ्यास केल्यानंतरच आणि तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यानंतरच निर्णय घेणे संयुक्तिक राहू शकते. अप्रत्यक्ष गुंतवणूक ही थेट मालमत्ता खरेदीसारखा अनुभव देऊ शकत नाही, मात्र ती मालमत्ता बाजारातील जोखीम आणि भांडवल समस्या बऱ्यापैकी निकाली काढू शकते हे समजून घ्यायला हवे. वैयक्तिक दृष्टीकोनातून देखील कमी पैशातून मालमत्तेत गुंतवणूक सुरू करणाऱ्यांसाठी ही पद्धत आदर्श आहे. या प्रक्रियेच्या मदतीने गुंतवणुकीचे ध्येय लक्षात ठेवत दीर्घकालीन ध्येयाना प्राधान्य द्यायला हवे.

**मालमत्ता गुंतवणुकीतील संतुलीत दृष्टीकोन :** गुंतवणुकीच्या जगात संतुलित पोर्टफोलिओ तयार करणे हे



यशाचे गमक आहे. एकीकडे प्रत्यक्ष मालमत्ता गुंतवणूक ही मोठा फायदा मिळवून देण्याची संधी देते तर त्याचवेळी अप्रत्यक्ष गुंतवणूक ही जोखीम कमी करण्यास मदत करते. कमी भांडवल, कमी जोखीम अणि अधिक लिक्विडीटीसह मालमत्ता बाजारात सहभागी होण्याचा हा एक स्मार्ट पर्याय आहे. नव्या गुंतवणूकदारांसाठी हा एक सर्वोत्तम मार्ग आहे. त्याचवेळी अनुभवी गुंतवणुकदार हे आपल्या पोर्टफोलिओला संतुलित करण्यासाठी या पद्धतीचा अंगीकार करू शकतात. तुम्ही मालमत्तेच्या गुंतवणुकीत अप्रत्यक्षपणे शिरण्याचा प्रयत्न करत असाल किंवा विचार करत असाल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्या आणि तुमची आर्थिक योजना सुरक्षित आणि संतुलित करा.

◆◆◆

## आर्थिक सर्वेक्षण काय असते?

दरवर्षी देशाचा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी सरकार संसदेत आर्थिक सर्वेक्षण मांडले जाते. देशाचे आर्थिक सर्वेक्षण १९५०-५१ मध्ये प्रथम सादर करण्यात आले, तेव्हापासून आजतागायत ही परंपरा कायम आहे.



आर्थिक सर्वेक्षण हे सरकारचे रिपोर्ट कार्ड मानले जाते. यामध्ये गेल्या आर्थिक वर्षातील कामगिरीचा आढावा घेण्यासोबतच भविष्यातील वाढीच्या संभाव्यतेबाबत अधिकृत दृष्टीकोन देण्यात येतो. याद्वारे सरकार देशाच्या अर्थव्यवस्थेची ताजी स्थिती सांगते. कोणत्या क्षेत्रातून किती उत्पन्न मिळाले आणि कोणती आव्हाने आहेत हे आर्थिक सर्वेक्षणात सांगितले जाते. आर्थिक प्रगतीच्या आड येणारे घटक कोणते आहेत आणि ते कसे दूर करता येतील याचाही समावेश असतो.

**माहीत आहे?**

अर्थव्यवस्थेला पूर्ण गतीने चालवण्यासाठी कोणती पावले उचलण्याची गरज आहे यावरही या सर्वेक्षणात प्रकाश टाकण्यात येतो. आर्थिक सर्वेक्षणाला अर्थसंकल्पाचा मुख्य आधार देखील म्हटले जाते. आर्थिक सर्वेक्षणात सामान्यांना महागाई आणि बेरोजगारीसारख्या महत्त्वाच्या आकडेवारीची माहिती दिली जाते. गुंतवणूक, बचत आणि खर्चाचीही कल्पना येते.

गुंतवणूकदारांच्या दृष्टिकोनातून हे सर्वेक्षण खूपच फायदेशीर आहे. यामुळे त्यांना कोणत्या क्षेत्रात गुंतवणुकीच्या चांगल्या संधी आहेत हे समजण्यास मदत होते. उदाहरणार्थ, जर सर्वेक्षणात पायाभूत सुविधांवर सरकारचा भर असल्याचे नमूद केले असेल, तर भविष्यात या क्षेत्राला चांगली संधी मिळू शकते.

एकंदरीत, आर्थिक सर्वेक्षण देशाचे एक चित्र सादर करते.

मुख्य आर्थिक सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक सर्वेक्षण तयार केले जाते. देशाचे आर्थिक सर्वेक्षण १९५०-५१ या आर्थिक वर्षात प्रथमच सादर करण्यात आले. सुरुवातीला ते अर्थसंकल्पाच्या दिवशीच सादर केले जात होते, परंतु १९६४ पासून ते अर्थसंकल्पाच्या एक दिवस आधी सादर केले जाऊ लागले.

◆◆◆

## सोने-चांदी का महागले आहे?

चीनमध्ये महागाई शून्य टक्क्यावर जाऊनही मागणी वाढत नाही. अमेरिकेचे नियोजित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प विविध देशांसंदर्भात आक्रमक वक्तव्य करत आहेत. अशा परिस्थितीत जागतिक तणाव वाढण्याच्या शक्यतेमुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने आणि चांदीचे खरेदी करीत आहेत. मागणीत वाढ झाल्याने सोन्याच्या दरात बरीच वाढ होत आहे.

**जाणून घ्या**

नजीकच्या भविष्यात शेअर बाजारातून सकारात्मक परताव्याची लक्षणे दिसत नसल्यामुळेही काही गुंतवणूकदार सोन्याकडे वळत असल्याचे चित्र बाजारात निर्माण झाले आहे.

चीनबरोबरच इतर देश सध्याच्या जागतिक अस्थिर परिस्थितीच्या काळात सोने खरेदी करीत असल्यामुळे सोन्याच्या दरात वाढ




होत आहे. देशातील आणि जागतिक वायदे बाजारातही सोने आणि चांदीचे दर वाढत आहेत. त्यामुळे लघु ते मध्यम पडल्यात या दोन धातूचे दर जास्त परतावा देण्याची शक्यता गुंतवणूकदारांना वाटत आहे.

जागतिक वायदे बाजारात सोन्याचा दर दहा डॉलरने वाढून २,६८२ डॉलर प्रति औंस या पातळीवर गेला. तर चांदीचा दर ०.८३ टक्क्यांनी वाढून ३०.९५ डॉलर प्रति औंस झाला. चीनमधील किरकोळ किमतीवर आधारित महागाई शून्य टक्क्याच्या जवळ आली आहे. तरीही चीनमध्ये मागणी वाढत नाही. सरकार समोर मागणी वाढविण्यासाठी काय करावे हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच अनेक देशांदरम्यान युद्ध चालू आहेत आणि ते संपण्याची शक्यता कमी आहे. या बाबीमुळे गुंतवणूकदार सोन्याकडे आकर्षित होत आहेत. ◆◆◆

## ‘पडझडी’मुळे घाबरू नका !

देशातील आणि परदेशातील नकारात्मक घटनाक्रमामुळे शेअर बाजाराचे निर्देशांक सध्या प्रचंड घसरले आहेत. मात्र २०२५ या वर्षात भारतीय शेअर बाजाराचे निर्देशांक किमान दहा टक्क्यांनी वाढतील, असे सिटी ग्रुप या संस्थेने भाकीत केले आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २०२५ मध्ये २६,००० अंकावर जाईल. नऊ वर्षापासून भारतीय शेअर बाजारानी सकारात्मक परतावा दिला असून दहाव्या वर्षात यात खंड पडणार नाही असे या संस्थेला वाटते.

अर्थव्यवस्था पुनरुज्जीवीत होत आहे. त्याचबरोबर कंपन्यांचे ताळेबंद नफादायक राहणार आहेत. अशा परिस्थितीत रिटेल गुंतवणूकदार जास्त गुंतवणूक करतील. पाच लाख कोटी डॉलरचा





भारतीय शेअर बाजार आणखी वाढेल असे या संस्थेचे म्हणणे आहे.

२०२४ मध्ये निफ्टी २२,५०० पर्यंत वाढेल असे भाकीत या संस्थेने केले होते. मात्र निफ्टी त्यापेक्षा जास्त पाच टक्क्यांनी वाढला आहे. सध्या नकारात्मक वातावरण असले तरी यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकार अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करेल. विकासदर ६.५% पेक्षा जास्त राहील. याचे सकारात्मक प्रतिबिंब शेअर बाजारात पडेल.

या अगोदर मॉर्गन स्टॅन्ली या संस्थेने २०२५ मध्ये निर्देशांक १८ टक्क्यांनी वाढतील असे म्हटले होते. शेअरच्या पुरवठ्यापेक्षा खरेदीची क्षमता जास्त आहे असे या संस्थेचे म्हणणे आहे. २०२४ मध्ये रिटेल गुंतवणूकदारांनी १.५ लाख कोटी रुपयांच्या शेअरची खरेदी केली. या वर्षात परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी एकतर्फे खरेदी न करता वातावरण अस्थिर ठेवले. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून रिटेल गुंतवणूकदारांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वास दाखवून शेअरची खरेदी चालूच ठेवली आहे.

आगामी काळातही परदेशी गुंतवणूक मर्यादित झाली तरी गुंतवणूकदार दीर्घ पल्ल्याचा विचार करून शेअर बाजारात खरेदी करीत राहण्याची शक्यता या संस्थेने व्यक्त केली आहे. विकासदर साडेसहा टक्के होणार असला तरी तो इतर देशापेक्षा जास्तच आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे सांगण्यात आले. ◆◆◆

## रुपया का घसरतोय?

इतर चलनाच्या तुलनेत वधारत असलेला डॉलर, अमेरिकेच्या कर्जरोख्यावरील वाढत असलेला परतावा, भारतीय शेअर बाजारातून परत जात असलेली परकीय गुंतवणूक आणि शेअर बाजार निर्देशांकात होत असलेली घट या कारणामुळे रुपयाचे मूल्य एकतर्फी घसरून रोज नव्या निचांकी पातळीवर जात आहे.



अशा परिस्थितीत आयात महाग होऊन भारतात महागाई वाढण्याचा धोका आहे. जर महागाई उच्च पातळीवर गेली तर त्यामुळे व्याजदर कपातीस उशीर लागण्याची भीती व्यक्त करण्यात येऊ लागली आहे. बुधवारी रुपयाचा भाव पुन्हा १३ पैशांनी कोसळून ८५ रुपये ८७ प्रति डॉलर या नव्या निचांकी पातळीवर गेला.

रुपयाच्या घसरणीला अनेक कारणे कारणीभूत असतानाच खनिज तेलाच्या किमती वाढत असल्याचे नवे कारण निर्माण झाले आहे. खनिज तेलाच्य किमती सध्या ७८ डॉलर प्रति पिंप या पातळीवर गेल्या आहेत. भारताला आपल्या गरजेच्या ८५% खनिज तेल आयात करावे लागते. जर खनिज तेल दर वाढले तर आहे आयातिचा खर्च आणखी महाग होऊन वाहतुकीचा खर्च वाढणार आहे. अशा परिस्थितीत इंधनाच दर वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. मात्र रुपयाचे मूल्य सावरण्यासाठी रिझर्व बँकेकडे डॉलरच्या साठ्याशिवाय इतर कोणतेही साधने उपलब्ध नाहीत. घसरणार्या रुपयामुळे आयात महाग होत असले तरी निर्यात वाढण्यास मात्र जास्त पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र जागतिक बाजारातून मागणी कमी असल्यामुळे रुपया घसरूनही निर्यात वाढण्यास मदत होत नसल्याचे दिसून येत आहे. कारण गेल्या दोन महिन्यापासून आयातीपक्षा निर्यात कमी आहे. यामुळे चालू खात्यावरील तूट वाढण्याचा धोका वाढला आहे. तसे झाले तर त्याचा रुपयांच्या मूल्यावर आणखी दबाव येऊ शकतो.

◆◆◆

## आर्थिक वर्षात सोन्याची विक्री केलीय?

तुम्ही सोने विकले असेल तर प्राप्तिकर भरावा लागेल. २३ जुलैच्या अर्थसंकल्पात सोन्याच्या विक्रीवर प्राप्तिकराशी संबंधित काही नियमांत बदल करण्यात आले. नवीन बदल जुलै २०२४ पासून लागू करण्यात आले आहेत. प्रत्यक्ष सोने असो किंवा पेपर गोल्ड किंवा डिजिटल गोल्ड असो, प्रत्येक प्रकारच्या सोन्याच्या विक्रीवर कर भरावा लागेल. अशावेळी सोन्याच्या विक्रीवर किती कर भरावा लागेल, हे समजून घेऊ.

**कराचे गणित**

सोन्याच्या विक्रीवर दोन प्रकारचा कर भरावा लागेल. शॉर्ट टर्म कॅपिटल गेन्स आणि दुसरे लाँग टर्म कॅपिटल गेन्स. सोन्याची विक्री किती काळानंतर करत आहात, यावर कर आकारणीचे गणीत अवलंबून आहे. यानुसार एलटीसीजी आणि एसटीसीजीची लागू होतो. हा कर विकलेल्या किंमतीवर बसत नाही तर सोन्याच्या विक्रीतून जो काही नफा होतो, त्यावर तो आकारला जातो.


**प्रत्यक्ष सोन्यावरचा कर**

तुम्ही प्रत्यक्ष सोने, दागिने, बिस्कीट, क्वाईन, वेढणी आदींची विक्री करत असाल तर एलटीसीजी आणि एसटीसीजी कर भरावा लागेल.

तुम्ही सोन्याची खरेदी करत त्याची दोन वर्षाच्या आत विक्री करत असाल तर त्यावर वीस टक्के एसटीसीजी द्यावा लागेल. पूर्वी हा पंधरा टक्के होता. २३ जुलैला सादर झालेल्या बजेटमध्ये त्यात वाढ करत तो वीस टक्के केला. त्यावर चार टक्के सेस देखील आकारला जातो. एकूण २०.८ टक्के कर भरावा लागेल. तुम्ही सोने खरेदी केल्यानंतर दोन वर्षानंतर त्याची विक्री करत असाल तर त्यावर एलटीसीजी भरावा लागेल. पूर्वी तो दहा टक्के होता. मागील अर्थसंकल्पात वाढ करत तो १२.५ टक्के केला आहे. अर्थात यातील कर सवलत एक लाखांपर्यंत वाढवत ती १.२५ लाख केली आहे.

**कर आकारणी कशी**

तुम्ही खरेदी केलेले सोने दोन वर्षाच्या आत विकले तर २० टक्के





एसटीसीजी आणि त्यावर चार टक्के सेस (अधिभार) द्यावा लागेल. उदा. तुम्ही दहा हजाराचे सोने खरेदी केलेले असेल आणि दोन वर्षात ते पंधरा हजाराला विकले तर अशावेळी पाच हजाराचा फायदा झाला.हा नफा आपल्या वार्षिक कमाईला जोडला जातो. त्यानंतर आपले वार्षिक उत्पन्न हे प्राप्तिकराच्या ज्या स्लॅबमध्ये येईल, त्यानुसार कर भरावा लागेल. अर्थात तुम्ही प्राप्तिकराचा नवा किंवा जुना स्लॅब निवडू शकता. तुमची एकूण कमाई शून्य टॅक्स स्लॅब येत असेल तर तुम्हाला कोणताही कर भरावा लागणार नाही. त्याचवेळी तुम्ही सोने दोन वर्षानंतर विकत असाल तर तुम्हाला १२.५ टक्के एलटीसीजी द्यावा लागेल. अर्थात तुमचा फायदा १.२५ लाख रुपयांपर्यंत असेल तर त्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. मात्र नफा सव्वा लाखांपेक्षा अधिक असेल तर त्यावर १२.५ टक्के दराने कर भरावा लागेल. ◆◆◆

# महिलांनी अर्थसाक्षर होण्यासाठी बँक व्यवहारांची अद्ययावत माहिती आवश्यक

## अमित मुथा यांचे प्रतिपादन; जितो लेडीज विंग आयोजित कार्यशाळेत महिलांनी गिरवले बँकिंगचे धडे

नगर – आताच्या डिजिटल युगात बँकिंग सेवा अत्यावश्यक बनल्या आहेत. बँकेतील खाते, त्यावर होणारे व्यवहार, पैसे काढणे, पैसे भरणा करणे, एटीएम, युपीआयचा वापर अशा अनेक गोष्टींची माहिती असणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेवून जितो अहमदनगर लेडीज विंगने महिलांसाठी अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या तारकपूर शाखेत महिलांसाठी बँकिंग बेसिक्स कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत महिलांना बँकेचे कामकाज प्रत्यक्षात कसे चालते हे जवळून अनुभवता आले. तारकपूर शाखेचे संपूर्ण संचालन महिला अधिकारी, कर्मचारी करतात. कार्यशाळेत सहभागी महिलांनी अतिशय उत्सुकतेने सर्व माहिती समजून घेत या उपक्रमाबद्दल जितो लेडीज विंगचे कौतुक केले.


जितो लेडीज विंगच्या वतीने मर्चंटस् बँकेच्या तारकपूर शाखेत आयोजित कार्यशाळेस उपस्थित महिला.

या कार्यशाळेप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालिका मिनाताई मुनोत, जितो अपेक्स मॅट्रोमनी समिती सदस्या मेघना मुनोत, जितो अहमदनगर चॅप्टर संचालक सुमंगला मुनोत, जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा संगिता मुथियान, मुख्य सचिव अंशु मुनोत, उपाध्यक्ष सोनाली डुंगरवाल, प्रीती मुथियान, प्रीती बोरा, शाखा व्यवस्थापक राजश्री अल्लडवार आदी उपस्थित होते.

संगिता मुथियान यांनी प्रास्ताविकात सांगितले की, महिलांमध्ये अर्थसाक्षरता वाढण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. आजकाल अनेक व्यवहार हे ऑनलाईन थेट बँक खात्यात होतात. त्यामुळे महिलांना बँकिंग कसे करावे, केवायसी प्रक्रिया अशा अनेक गोष्टी कार्यशाळेत प्रत्यक्ष शिकायला मिळाल्या. या उपक्रमासाठी बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यशाळेत उपस्थित महिलांना बचत, चालू खाते उघडण्याची प्रक्रिया,आवश्यक कागदपत्रे, केवायसीचे महत्व, ठेवी व पैसे काढण्यासाठी पावत्या कशा लिहाव्यात, एटीएमचा सुरक्षित आणि प्रभावी उपयोग, नेट बँकिंगचे फायदे, बँकेच्या ठेव योजना, कर्ज योजना, लॉकर सुविधेची प्रक्रिया अशा विविध विषयांची सखोल माहिती देण्यात आली तसेच विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

अमित मुथा म्हणाले, संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी नेहमीच महिला सक्षमीकरणावर भर दिला जातो. त्यामुळे तारकपूर शाखेचे संपूर्ण संचालन महिला कर्मचारी करतात. आताच्या काळात महिलांनी आर्थिक व्यवहाराच्या नवनवीन पध्दती, बँकिंग क्षेत्राबाबत सजग असणे गरजेचे आहे. यासाठी जितो लेडीज विंगने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. भविष्यातही अशा कार्यशाळांना बँकेकडून आवश्यक सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यशाळेत तारकपूर शाखेतील कर्मचारी प्रिया गांधी, दीपाली भंडारी, सोनाली गायकवाड, मानसी कटारिया, मनिषा गांधी यांनी बँकेच्या कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी संयोजिका प्रीती मुथियान, प्रीती बोरा यांनी विशेष योगदान दिले. शेवटी मुख्य सचिव अंशु मुनोत यांनी आभार मानले.


सकल मराठा समाजाच्या वतीने राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना समाजबांधव.

# भिंगार येथे सकल मराठा समाजातर्फे राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

नगर – जिजामातांचे धैर्य, कर्तव्याची तीव्र भावना, स्वाभिमान यामुळे शिवाजी महाराजांना सर्वात महान मराठा शासक आणि योद्धा बनण्याची प्रेरणा मिळाली. राजमाता जिजाऊ यांच्या याचं संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्य स्थापन करू शकले. त्यांच्यामुळे सर्व महिला देखील सुरक्षित होते हे श्रेय छित्रपती शिवाजी महाराज यांच्या आई राजमाता जिजाऊंना जाते. खऱ्या अर्थाने त्यांच्या संस्कारातून उभं राहिलेलं स्वराज्य हे इतिहासात आदर्श राज्य मानलं जातं असे प्रतिपादन भिंगारच्या सकल मराठा समाजाचे अध्यक्ष राजेश काळे यांनी केले

भिंगार येथे सकल मराठा समाजाच्या वतीने राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी अध्यक्ष राजेश काळे, सुशीला कापसे, कांता बोठे, मनीषा कापसे, शुभांगी साठे, शिवाजी बेरड, बाबासाहेब चव्हाण, रमेश कडूस, मच्छिंद्र बेरड, शामराव वागस्कर, संपत बेरड, अरुण चव्हाण, कैलास वागस्कर, कल्याण पवणे, संतोष बोबडे, अजय सपकाळ, रमेश तनपुरे, विलास शिंदे, राजेंद्र कडूस, कैलास वागस्कर, नवनाथ मोरे, भूषण थोरात, अनुप शिंदे, अक्षय तोडमल, गणेश शिंदे, अभिजीत सपकाळ, वैभव सासवडे, दत्तात्रय शिंदे, गणेश वागस्कर, ईश्वर बेरड, अमोल वागस्कर, नंदू भंडारे, राहुल पानसरे, संजय सपकाळ, गणेश सातकर, पंकज चव्हाण,कैलास काटे, सागर मिसाळ, गोरख चव्हाण, प्रशांत कराळे, सचिन क्षिरसागर, अंकुश शिंदे, अच्युत गाडे, अविनाश लांडगे, योगेश करांडे, ॲड संग्राम जगताप, विक्रांत भालसिंग, श्रीकांत क्षिरसागर, बाळासाहेब खोमणे सर, अनिल तनपुरे, ईश्वर गपाट, डॉ.रामदास केदार, संजय कापसे, सचिन खोमणे, संजय कडूस, महेश हापसे, संदीप खोमणे, हर्षद काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बीड मधील सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सूर्यवंशी यांच्या हत्येचा भिंगार मराठा समाजाच्या वतीने जाहीर निषेध करत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली तसेच सकल मराठा समाजाच्या वतीने आवाहन करण्यात आले की असे गैर कृत्य पुन्हा घडू नये याचे प्रशासनाने दखल घ्यावी अन्यथा मराठा समाज हे जशास तसे उत्तर द्यायला समर्थ आहे.

# नगर व टाकळी ढोकेश्वरमध्ये गुरुवारी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

## रुबी हॉल क्लिनिक येथील हृदयरोग तज्ज्ञांचे होणार उपचार मार्गदर्शन

नगर : पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १६ जानेवारी रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे दुपारी १२.३० ते १.३० यावेळेत तर नगरमध्ये सिटी केअर हॉस्पिटल येथे दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी. टाकळी ढोकेश्वर येथील शिबिराच्या नाव नोंदणीसाठी ७०२०४४८३७४, ९०११११६३३ या मोबाईल क्रमांकावर तर नगरमधील शिबिरासाठी ९२०९६३२५०२, ७३८५१९५९६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नूतन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचा नगरमध्ये सन्मान

नगर – सर्वांच्या सहकार्यातून लोकप्रतिनिधी म्हणून झालेली निवड ही निश्चितपणे सगळ्यांचे सामूहिक यश आहे. अनेक मानसन्मान सतत होत असताना त्यामध्ये अहिल्यानगर मध्ये झालेला सन्मान हा माहेरचा सन्मान असून तो अधिकच भावणारा असल्याचे प्रतिपादन नूतन राज्यमंत्री सौ माधुरी मिसाळ यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले.

अहिल्यानगरमध्ये त्यांच्या आगमन प्रसंगी लाड सुवर्णकार समाज ट्रस्टच्या वतीने सौ. माधुरी मिसाळ यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

या प्रसंगी लाड सुवर्णकार समाज ट्रस्ट यांच्या वतीने अनिकेत कुलथे यांनी मंत्री माधुरीताई मिसळ यांचा अहील्यानगर इथे आल्या असता विश्राम गृह इथे शाल देऊन सन्मान केला. त्या प्रसंगी ट्रस्टचे संचालक सचिन देवळालिकर, सुरेश मैड, मुकूंद निफाडकर, शाम मुंडलक, विनोद कूलथे, योगेश नांगरे, रमेश मुंडलीक, प्रकाश देवळालिकर, शरद कुलथे, गणेश डहाळे इत्यादी हजर होते.


लाड सुवर्णकार समाज ट्रस्ट यांच्या वतीने अनिकेत कुलथे यांनी माननीय आमदार माधुरीताई मिसळ यांचा अहील्यानगर येथे आल्या असता त्यांचा शाल देऊन सन्मान केला. त्याप्रसंगी ट्रस्टचे संचालक सचिन देवळालिकर, सुरेश मैड, मुकूंद निफाडकर, शाम मुंडलक, विनोद कूलथे, योगेश नांगरे, रमेश मुंडलीक, प्रकाश देवळालिकर, शरद कुलथे, गणेश डहाळे आदी.

# शहरात भाजपच्या हर घर सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ

## दुकानदार, व्यावसायिक, टपरीचालक, रिक्षा चालकांनी केली ऑनलाईन सदस्य नोंदणी

नगर – संपूर्ण शहर भाजपमय करण्यासाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहे. घरोघरी, महाविद्यालय व विविध संस्थेत जाऊन सभासद नोंदणी सुरू करण्यात आलेली आहे. इच्छुक नागरिकांना देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भाजपचे सदस्य बनवून घेतले जात असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी सांगितले.

शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील रेल्वे स्टेशन परिसरात हर घर सदस्य नोंदणी अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. यावेळी आगरकर बोलत होते. याप्रसंगी माजी उपमहापौर गीतांजलीताई काळे, शहर सचिव दत्ता गाडळकर, विशाल खैरे, विजय गायकवाड, सुरेश लालबागे, पुंडलिकराव गदादे, पंडित खुडे, ताराचंद भनगे, सागर गांधी, भगवान कुडधने, रोहन गोंटे, सिद्धू झावरे, शंतनू गाडळकर आदींसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


शहरात भाजपच्या हर घर सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ झाला असून ही सदस्य नोंदणी करताना शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्यासह पदाधिकारी.


दत्ता गाडळकर म्हणाले की, हर घर सदस्य नोंदणीला नागरिकांमधून स्वयंफुर्तीने प्रतिसाद मिळत आहे. नागरिक भाजपचे सदस्य होण्यासाठी स्वतः हून इच्छा व्यक्त करत आहे. मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिक भाजपचे सदस्य होण्यासाठी पक्षातील सर्व पदाधिकारी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

विशाल खैरे म्हणाले की, कल्याणकारी राज्यामुळे भाजपकडे सर्वसामान्य जनता आकर्षित होत आहे. भाजपने आपल्या सत्तेत सर्वसामान्य नागरिकांना आधार दिला. तर लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान मिळवून दिला आहे. यासाठी नागरिकांमधून सदस्य होण्यासाठी मागणी वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रेल्वे स्टेशन भागातील विविध दुकानदार, टपरीचालक, रिक्षा चालक, व्यावसायिक व घरोघरी जावून नागरिकांची ऑनलाईन पध्दतीने सभासद नोंदणी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात सदस्य नोंदणी अभियान हाती घेण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १५ मध्ये शहर सचिव दत्ता गाडळकर यांच्या पुढाकाराने ही मोहिम राबविण्यात आली.

# शहरातील महापुरुष, राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांची नियमित स्वच्छता करावी

## महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांचे उद्यान विभागाला आदेश



नगर – शहरात विविध महापुरुष व राष्ट्रपुरुषांचे सुमारे २५ पुतळे आहेत. या पुतळ्यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजाला मिळते. या पुतळ्यांच्या परिसरात व पुतळ्यांची नियमित स्वच्छता होणे आवश्यक आहे. उद्यान विभागाने याबाबत गांभीर्याने उपाययोजना करून सर्व पुतळ्यांची नियमित स्वच्छता करावी, परिसरातही दैनंदिन साफसफाई होईल, याची दक्षता घ्यावी, असे आदेश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिले आहेत.

स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याची स्वच्छता करून पॉलिश करण्यात आली. यानिमित्ताने आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी शहरातील सर्व राष्ट्रपुरुष व महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता व देखभालीचा आढावा घेतला. शहरात सुमारे २५ महापुरुषांचे पुतळे आहेत. त्यांच्या परिसरात अथवा पुतळ्याची स्वच्छता नियमित झालीच पाहिजे. उद्यान विभागाने यासाठी कर्मचारी नियुक्त केला आहे. या कर्मचाऱ्याने दररोज पुतळ्यांच्या परिसरात पाहणी करावी. पुतळ्याची स्वच्छता करावी. या कामात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेणार नाही. त्यामुळे उद्यान विभागाने याबाबत गांभीर्याने उपाययोजना कराव्यात, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिले आहेत.

दरम्यान, शहरात स्वच्छता अभियान सुरू आहे. यात सातत्य ठेवावे. शहरात कुठेही कचरा साचणार नाही, याची दक्षता स्वच्छता निरीक्षकांनी घ्यावी. महापुरुषांच्या पुतळ्यांच्या परिसरातही स्वच्छता झाली की नाही, याची नियमित तपासणी करावी. शहरात अस्वच्छता आढळल्यास, पुतळ्यांच्या परिसरात अस्वच्छता आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.


पद्मशाली समाजाच्या वतीने नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचा सत्कार करताना श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम. समावेत पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम सर, पंच कमिटीचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, विश्वस्त विनायक गुडेवार आदी.

# राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे पद्मशाली समाजाच्यावतीने स्वागत

नगर – राज्याच्या नवनियुक्त नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शनिवारी अहिल्यानगर शहरास धावती भेट दिली. शासकीय विश्रामगृहावर पद्मशाली समाजाच्या वतीने मंत्री माधुरी मिसाळ यांचे श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी स्वागत करून सत्कार केला.

यावेळी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, पंच कमिटीचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, विश्वस्त विनायक गुडेवार, राजू म्याना, शंकर येमुल, राजू जामदारे व सचिन सोनवणे आदी उपस्थित होते.

यावेळी शहरातील पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत श्री मार्कंडेय महामुनींच्या ऐतिहासिक मंदिराच्या जीर्णोद्धार कामाची माहिती श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी दिली. तसेच शहरात लवकरच होणाऱ्या पद्मशाली समजाच्या राज्यस्तरीय वधुवर मेळाव्याचे निमंत्रण मंत्री मिसाळ यांना यावेळी देण्यात आले.

# बालिकाश्रम रोडवरून शहर बससेवा सुरू करावी

नगर – महानगरपालिकेने शहर बस सेवा ही बालिकाश्रम रोड मार्गे सुरू करावी आणि या मार्गावर थांबे द्यावेत अशी मागणी बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपचे सदस्य तथा एड. अशोक गायकवाड यांनी मागणी केली आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, सध्या शहरातील बहुतेक रस्त्यांची कामे सुरू आहेत. दिल्ली दरवाजा ते सिव्हिल हॉस्पिटल रस्त्याचेही काम सुरू आहे. त्यामुळे बहुतांश सावेडीकडून दिल्ली दरवाजा व दिल्ली दरवाजाकडून सावेडी वाहतूक ही बालिकाश्रम रोड ते हॉटेल पंचशील सावेडी यामार्गे दोन्ही बाजूने सुरू आहे. तसेच या मार्गाने शहर बस वाहतूक निंबळक व. एम आय डी सी.करीता सध्या रोजच सुरू असल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेने बालिकाश्रम रोडमार्गे शहर बस वाहतूक नियमित सुरू करावी. ज्याचे बस स्टॉप हे आर्यन गार्डन (सुडके मळा), गोंदवलेकर महाराज मंदिर (बोरुडे मळा) महालक्ष्मी उद्यान (भुतकर वाडी), व खंडोबा मंदिर (परीचय हॉटेल) सावेडी असे असावेत, अशी मागणी या परिसरात राहणारे नागरिक करत आहेत.

# चिमुकल्यांनी केला गजर हरिनामाचा, उपस्थितांनी अनुभवला सोहळा वारीचा

नगर – परिवर्तन प्रतिष्ठान संचलित पालवी शिशुविहार, बालक मंदिर महिला मंडळ, आनंदभूमी यांनी ५ जानेवारी २०२५ रोजी ऊर्जा गुरुकुल सभागृह, केडगांव याठिकाणी स्नेहसंमेलन आयोजित केले होते.

जाऊ संतांचिया गावा या संकल्पनेवर आधारीत या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नाट्यकर्मी पी. डी. कुलकर्णी होते. प्रमुख पाहुणे म्हणून म.न.पा. प्रशासनाधिकारी जुबेर पठाण तसेच शाळेचे माजी विद्यार्थी असलेले प्रसिद्ध उद्योजक प्रफुल्ल नातू उपस्थित होते. यावेळी संस्कारित वातावरण घर आणि शाळा दोन्ही ठिकाणी असायला हवे. सध्या शाळांमध्ये आणि पालकांमध्ये जे स्पर्धेचे वातावरण असते ते विद्यार्थ्यांसाठी अतिशय हानीकारक असल्याचे जुबेर पठाण म्हणाले. श्री. प्रफुल्ल नातू यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना त्यांच्या शाळेतील आठवणींना उजाळा दिला. अशा शाळा या मुलांना सर्वोत्तम माणूस म्हणून घडवतात असे ते म्हणाले. पी. डी. कुलकर्णी यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात मुलांना मातृभाषेतूनच शिक्षण देण्याचा मुद्दा अधोरेखित केला. मुलांना स्वतःचे उत्कृष्ट व्यक्तिमत्व घडवण्यासाठी पालकांनी मदत करावी असे मत त्यांनी व्यक्त केले. मुलं आपल्या संस्कृतीपासून दूर जाणार नाहीत याची फार मोठी जबाबदारी शाळा आणि घराची आहे असे सांगून संत परंपरा या संकल्पनेवर आधारीत स्नेहसंमेलन ठरविल्याबद्दल त्यांनी परिवर्तन प्रतिष्ठानचे अभिनंदन केले.


परिवर्तन प्रतिष्ठान संचलित बालक मंदिर महिला मंडळ शाळेच्या स्नेहसंमेलनाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ.अनिकेत घोटणकर, रविंद्र करंदीकर, सौ. ज्योतीताई केसकर, मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ, पी. डी. कुलकर्णी आदी.

प्रास्ताविक परिवर्तन प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अनिकेत घोटणकर यांनी केले. यावेळी परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविंद्र करंदीकर, महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. ज्योतीताई केसकर उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी वर्षभरातील कार्यक्रम अहवालरुपाने पडद्यावर सादर केले.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी संत परंपरेवर आधारीत पंढरीची वारी, अभंग, गवळण, भारुड, नाटिका, नृत्य सादर केली. सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती असलेल्या सर्वांची दाद मिळाली. चित्रपटातील अर्थहीन गाण्यांवर नाचण्यापेक्षा अशा प्रकारच्या सादरीकरणातून मुलांवर चांगले संस्कार होतात असा सूर पालक वर्गातून उमटला.

स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने पारितोषिक वितरण, रांगोळी प्रदर्शन, हस्तकला प्रदर्शन तसेच हस्तलिखित प्रकाशन असा सोहळा शाळेत संपन्न झाला. यावेळी भिंगार हायस्कूलच्या माजी पर्यवेक्षक सौ. गीतांजली भावे, शिशुविहार बालवाडीच्या सौ. सुनिता देव, परिवर्तन प्रतिष्ठानचे डॉ. अरुण कुलकर्णी, विकास कावरे आदींची उपस्थिती होती.

